POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२५७ ● मुंबई, सोमवार, २० एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### ड्रग्ज प्रकरणात कारवाईला वेग द्या

गोरेगाव ड्रग्ज प्रकरणात दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने हे प्रकरण मुख्यमंत्र्यांनी अधिक गांभीयानें घेतले आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभर ड्रग्जविरोधात मोठ्या प्रमाणात कारवाया करण्याचे आदेश त्यांनी दिले. तरुणाईच्या भविष्याशी निगडित हा गंभीर मुद्दा असल्याने अशा प्रकरणांकडे अत्यंत गांभीयानें पाहावे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दरम्यान, या बैठकीला राज्याचे पोलीस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, एसआयटी प्रमुख तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## धर्मांतरासारखे प्रकार खपवून घेऊ नका

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे पोलिसांना निर्देश

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यात धर्मांतरासारखे प्रकार खपवून घेऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पोलिस प्रशासनाला दिले. नाशिक धर्मांतर प्रकरण, अमरावती जिल्ह्यातील परतवाडा लैंगिक शोषण प्रकरण, भोंदूबाबा खरात आणि मुंबईतील गोरेगाव ड्रग्ज प्रकरणांचा तपास अधिक प्रभावी आणि निष्पक्ष करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत गृह विभागाचा सविस्तर आढावा घेताना विविध संवेदनशील प्रकरणात योग्य तपास करून कडक कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले. नाशिकमधील धर्मांतराच्या प्रकरणावर बोलताना फडणवीस



यांनी धर्मांतरासारखे प्रकार अजिबात खपवून घेऊ नका, असे पोलिसांना स्पष्टपणे बजावले. हे प्रकरण स्वतःहून उजेडात आणल्याबद्दल नाशिक पोलिसांचे त्यांनी कौतुक केले. मात्र आता तपास तितकाच दमदार व्हावा. यात असणाऱ्या सर्व पॅटर्नचा तपास करा. कोणताही मुद्दा तपासातून सुटू नये, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात पीडितांना तक्रार देण्यासाठी विश्वास देणे आवश्यक आहे. त्यासाठी समुपदेशनाची मदत घेण्याची सूचना देण्यात आल्या. संबंधित प्रकरणात समाज सेवकांचा सहभाग वाढवून पीडितांना आधार देण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला. खरात प्रकरणात पीडितांचा विश्वास जिंकणे सर्वात महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी बैठकीत स्पष्ट केले. या प्रकरणात दोषी कोणीही असो, त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, यासाठी भक्कम पुरावे गोळा करण्याचे आदेश त्यांनी दिले. न्यायालयात खटला मजबूत होण्यासाठी तपासाची दिशा ठोस ठेवावी आणि अपराध सिद्धी हा केंद्रबिंदू असावा, अशी सूचनाही फडणवीस यांनी केली.

### उष्माघातानंतर वादळी पावसाचे संकट

पश्चिम महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. सध्याच्या हवामान अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र २२ तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल, अशी माहिती मंत्रालयातील आपत्कालीन विभागाकडून देण्यात आली. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांना सतर्कतेचे आवाहन केले आहे. संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन तातडीने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतकऱ्यांनी शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत, काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत किंवा ताडपत्री/झाकणाने सुरक्षित ठेवावीत. वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, शेतमाल, भाजीपाला व इतर काढणी केलेले उत्पादन मोकळ्यावर ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मध्य आशियातील नामांकित कंपन्या महाराष्ट्रात डेटा सेंटर स्थापन करणार

राज्यातील उद्योगस्नेही वातावरणाचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले असून, मध्य आशियातील डेटा सेंटर क्षेत्रातील दिग्गज कंपन्या महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक करण्यास सज्ज झाल्या आहेत. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी संबंधित कंपन्यांना जागा आणि वीज उपलब्धता प्राधान्याने करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे डेटा सेंटर्स संदर्भात शनिवारी आयोजित सादरीकरण व बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. या बैठकीस महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव लोकेश चंद्रा, डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विकास आयुक्त, व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "डेटा सेंटर क्षेत्रातील अनेक नामांकित कंपन्या महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी उत्सुक आहेत. या कंपन्यांच्या प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असलेली सर्व तांत्रिक कामे आणि प्रामुख्याने जमीन उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात यावी. या प्रकल्पांना लागणारा वीजपुरवठा ही प्राथमिकता मानून ऊर्जा विभागाने त्याबाबत योग्य दक्षता घ्यावी."

### आठवड्याच्या पहिल्याच दिवशी भयंकर संकट

**महाराष्ट्रातील 19 जिल्ह्यांना पाऊस झोडपणार, या राज्यांनाही गंभीर इशारा**

गेल्या काही दिवसांपासून सूर्य आग ओकत आहे, त्यामुळे अनेक राज्यांमधील तापमान वाढलेले आहे. महाराष्ट्रासह दिल्ली, बिहार आणि पश्चिम बंगालमधील तापमान 45 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. अशातच आता संपूर्ण देशातील हवामानात मोठा बदल जाणवणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार जम्मू आणि काश्मीर आणि शेजारील पाकिस्तान भागावर पश्चिमी विक्षोभ सक्रिय आहे. अरबी समुद्रातून येणाऱ्या दमट वाऱ्यांमुळे कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे यामुळे उत्तर-पश्चिम ते पूर्व भारतात वादळ, पाऊस आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता**

हवामान विभागाने राजधानी दिल्ली-एनसीआरमध्ये (गुरुग्राम, फरीदाबाद, नोएडा, गाझियाबाद, मेरठ, सोनीपत) पावसाचा येलो आणि काही भागांत ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. काही ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. पंजाब आणि हरियाणामध्ये 50-70 किमी/ताशी वेगाने धुळीचे वारे वाहून त्यानंतर जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे.

**इतर राज्यांमध्ये काय स्थिती?**

उत्तर प्रदेशातील नोएडा, गाझियाबाद, मेरठ, आग्रा येथे वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागात मुसळधार पावसासह बर्फवृष्टी आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. बिहार आणि बंगालमध्येही वादळी पावसाची शक्यता आहे. राजस्थानच्या पूर्व भागात आणि मध्य प्रदेशच्या काही भागात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. तमिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा मध्ये हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे, काही ठिकाणी गारपीटही होऊ शकते.

**महाराष्ट्रातील परिस्थिती काय?**

महाराष्ट्रातील 19 जिल्ह्यांसाठी पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड, पालघर, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धुळे, नंदुरबार आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे.




# विकसित भारताच्या संकल्पात पालघरचा सहभाग अनिवार्य : राज्यपाल जिष्णू देव वर्मा

## डहाणूत आरोग्य सुविधांचे लोकार्पण

■पालघर। प्रतिनिधी,

भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करताना समाजातील अंतिम घटकाचा विकास करणे व त्या घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. पालघरच्या सर्वांगीण विकासाशिवाय विकसित भारताचा संकल्प पूर्ण होऊ शकत नाही, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज डहाणू येथे केले.

मार्च 2026 मध्ये राज्याच्या राज्यपालपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर राज्यपालांचा हा पहिलाच पालघर जिल्हा दौरा असल्याने पालघरवासियांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. अक्षय्य तृतीया आणि भगवान श्री परशुराम जयंतीच्या शुभ मुहूर्तावर डहाणू तालुक्यातील ओसरविरा येथे वनबंधू ट्रस्ट आणि भारत विकास संगम यांच्याद्वारे पालघर जिल्ह्यातील दुर्गम भागांमध्ये फिरते दवाखाने आणि रुग्णवाहिका सेवांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी भारत विकास संगमचे संरक्षक संजय पटेल, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड, पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, जिल्हा परिषद






मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, वनबंधू ट्रस्टचे अध्यक्ष आणि विश्वस्त लाडूलाल सोनी, योगायतन ग्रुपचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रताप सिंह, ज्येष्ठ समाजसेवक सुशील सिंघानिया आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

आपल्या भाषणाची सुरुवात 'सर्वे भवन्तु निरामयः' या मंत्राचा उल्लेख करीत त्यांनी केली व आरोग्य सुविधा केवळ शहरांपुरत्याच मर्यादित न राहता त्या दुर्गम भागात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे, हा आपला मुख्य संकल्प आहे. पालघर जिल्ह्यासारख्या आदिवासीबहुल क्षेत्रात रोजगार, आरोग्य आणि पिण्याच्या पाण्याची समस्यांवर ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि पालघरमध्ये एक 'आदर्श गाव' संकल्पना राबविण्यासाठी लोकभवन स्तरावर नियोजन सुरू असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. यासाठी लवकरच जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांची बैठक घेऊन एक सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करण्यात येईल, अशी महत्त्वाची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास' या भूमिकेचा संदर्भ देत, राज्यपाल म्हणाले की, विकासाच्या प्रक्रियेत 'अंत्योदय' म्हणजेच रांगेतील शेवटच्या माणसाला प्राधान्य देणे आमचे कर्तव्य आहे. वन बंधू ट्रस्टच्या माध्यमातून दुर्गम भागात फिरता दवाखाना, रुग्णवाहिका आणि डॉक्टर उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. चांगले इंजिनिअर, तंत्रज्ञ किंवा सनदी लेखापाल होणे ही चांगली गोष्ट आहे. पण त्यापेक्षा समाजात चांगला नागरिक म्हणून कार्य करणे ही त्याहून मोठी गोष्ट असल्याचे सांगून पीडितांची सेवा करणे हाच खरा स्वर्ग असल्याचे राज्यपालांनी नमूद केले. या दौऱ्याच्या निमित्ताने त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून दुर्गम भागातील पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. आदिवासी बांधवांच्या प्रगतीसाठी लोकभवनाचे दरवाजे सदैव उघडे राहतील आणि पालघरच्या विकासासाठी स्वतः जातीने लक्ष घालणार असल्याची ग्वाही दिली.

वन बंधू ट्रस्टचे अध्यक्ष लाडू लाल सोनी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी ट्रस्टच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या आरोग्य प्रकल्पांची माहिती देऊन आदिवासी दुर्गम भागातील नागरिकांना तातडीची वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी ट्रस्ट कटिबद्ध असल्याचे सांगितले.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रशासकीय आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून दुर्गम भागाचे चित्र कसे बदलता येईल, यावर प्रकाश टाकला.

पालघरच्या जिल्हाधिकारी श्रीमती इंदुराणी जाखड यांनी आपल्या मनोगतात जिल्ह्यातील आरोग्य सद्यस्थिती आणि राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांविषयीची माहिती दिली. तसेच, राज्यपालांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन अधिक वेगाने कार्य करेल, अशी ग्वाही दिली.

# धर्मांतरप्रकरणी नाशिकमध्ये हिंदुत्ववादी संघटनांचा एल्गार

## रणरणत्या उन्हात महिला, तरुणी, युवकांनी काढली आक्रमक रॅली

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकमधील कंपनीत घडलेल्या लैंगिक शोषण आणि धर्मांतर प्रकरणाचा निषेध करण्यासाठी हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने शहरात भव्य बाइक रॅली काढण्यात आली. नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या महिला अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणाच्या निषेधार्थ शहरातील वातावरण तापलेले असतानाच हिंदुत्ववादी संघटनांनी आक्रमक भूमिका घेत गुरुवारी मोठी बाइक रॅली काढली. या रॅलीत शेकडो महिला, तरुणी आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून नाशिकमध्ये तापमान ३८ ते ३९ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले असतानाही आंदोलकांनी उन्हाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून आपला संताप व्यक्त केला.



**रॅलीला रणरागिणींच्या बाइक रॅलीचे स्वरूप**

या आंदोलनात महिलांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. अनेक तरुणी आणि महिला दुचाकीवरून सहभागी झाल्या होत्या, त्यामुळे या रॅलीला रणरागिणींची बाइक रॅली, असे स्वरूप प्राप्त झाले. भाजपच्या आमदार देवयानी फरांदे यांनीही या रॅलीत सहभाग घेत आंदोलकांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शवला. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

धर्मांतराच्या कथित घटनेचा गंभीर प्रकार ज्या कंपनीत घडल्याचा आरोप आहे, त्या ठिकाणाहून ही रॅली सुरू झाली. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत ती जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पोहोचली. रॅलीदरम्यान आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत संबंधित प्रकरणाचा तीव्र निषेध नोंदवला. धर्मांतराच्या कथित षडयंत्राविरोधात कठोर कारवाईची मागणी यावेळी सातत्याने करण्यात आली.

**आरोपींवर कठोर कारवाईची मागणी**

आंदोलकांची प्रमुख मागणी म्हणजे पीडित महिलांना तत्काळ न्याय मिळावा आणि अटक करण्यात आलेल्या आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी होती. या प्रकरणामुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा मुद्दा ऐरणीवर आला असून, नागरिकांमध्येही संतापाची भावना निर्माण झाल्याचे दिसून आले. विविध हिंदुत्ववादी संघटना या मुद्द्यावर एकत्र आल्याने आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. नाशिकमधील विविध हिंदुत्ववादी संघटना या मुद्द्यावर एकत्र आल्या असून, शहराच्या सुरक्षेचा प्रश्न त्यांनी लावून धरला आहे. रॅलीच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी ठिकठिकाणी कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता.

**घोषणाबाजीमुळे वातावरण तणावपूर्ण**

रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. शहरातील प्रमुख चौकांमध्ये पोलीस तैनात करण्यात आले होते. आंदोलकांची संख्या मोठी असतानाही रॅली शांततेत पार पडली, मात्र घोषणाबाजीमुळे वातावरण तणावपूर्ण राहिले. दरम्यान, या आंदोलनामुळे नाशिकमधील धर्मांतर आणि अत्याचार प्रकरणाच्या चौकशीला अधिकच वेग मिळाला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे. प्रशासनावरही या प्रकरणात जलद आणि ठोस कारवाई करण्याचा दबाव वाढताना दिसत आहे.

## नाशिक, परतवाड्यानंतर आता राळेगाव

## तब्बल 34 मुलींसोबत... नेमकं काय घडलं?

■यवतमाळ। प्रतिनिधी,

सध्या राज्यात महिला अत्याचाराचे अनेक गुन्हे समोर येत आहेत. त्यातच आता यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव शहरातून तब्बल ३४ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. मानवी तस्करी आणि अल्पवयीन मुलींच्या बेपत्ता होण्याचा ही एक अत्यंत गंभीर आणि थरकाप उडवणारी घटना घडल्याचे समोर आले आहे. राळेगाव जवळपास ३४ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या असून त्यांना परराज्यात देहव्यापारासाठी विकले जात असल्याचा खळबळजनक संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

"या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आमदार अशोक उईके आणि भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल्लसिंह चौहान यांनी तातडीने पोलीस प्रशासनाची भेट घेतली. गेल्या काही दिवसांपासून भाजप सातत्याने या प्रकरणावर लक्ष ठेवून होती. राळेगाव शहरात अल्पवयीन मुलींना बाहेर राज्यात विकणे आणि मानवी तस्करी यांसारखे गंभीर गुन्हे घडत आहेत. याबद्दल प्रशासनाने तातडीने दखल घेणे आवश्यक आहे,''असे मत प्रफुल्लसिंह चौहान यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी पोलीस उपविभागीय अधिकारी बन्सल आणि स्थानिक पोलीस निरीक्षकांशी सविस्तर चर्चा करून या प्रकरणाशी संबंधित एक महत्त्वाची ऑडिओ क्लिप देखील पोलिसांकडे सुपूर्द केली आहे.

या प्रकरणाची तीव्रता पाहता मंत्र्यांनी स्वतः राळेगाव पोलीस स्टेशनला भेट देऊन प्रकरणाचा आढावा घेतला. या तपासात कोणतीही हलगर्जी खपवून घेतली जाणार नाही, असा सल्ला अशोक उईके यांनी दिला. आरोपींना लवकरात लवकर शोधून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, पीडित मुलींचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणांनी अधिक गतीने काम करावे, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

दरम्यान सध्या राज्यात परतवाडा आणि नाशिक येथील आयटी कंपनीत महिला अत्याचाराच्या घटना समोर आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर राळेगावमधील हा प्रकार अधिकच संवेदनशील मानला जात आहे. या टोळ्यांचे जाळे राज्यभर पसरले आहे का? याचाही सखोल तपास करण्याची मागणी आता जोर धरत आहे. राज्यात घडत असलेल्या घटनेनंतर आता महिला सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रशासन याकडे कशाप्रकारे कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तृतीयपंथी बनवलं, नंतर मुलीचे कपडे घालून... मुंबईत १७ वर्षीय मुलासोबत भयंकर घडलं

■मुंबई। प्रतिनिधी,

तृतीयपंथी बनवून एका सतरा वर्षाच्या मुलाला भीक मागण्यास तसेच मुलीचे कपडे घालून इतर पुरुषासोबत वेश्याव्यवसायास प्रवृत केल्याप्रकरणी एका मुख्य आरोपीस गुन्हे शाखेच्या अधिकार्यांनी अटक केली.


बाबू आयनल खान ऊर्फ बाबू गुरु ऊर्फ बाबू हिजडा असे या आरोपीचे नाव असून तो बांगलादेशी नागरिक आहे. गुन्हा दाखल होताच तो पळून गेला होता, अखेर त्याला वाशी येथून अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

बाबू खान हा बांगलादेशी नागरिक असून गेल्या काही वर्षापासून गोवंडी परिसरात राहत होता. याच परिसरात तो किन्नर गुरु म्हणून परिचित होता. काही दिवसांपूर्वी या परिसरातील एक अल्पयवयीन मुलगा मिसिंग झाला होता. या मुलाचा त्याच्या पालकांनी सर्वत्र शोध घेतला, मात्र तो कुठेच सापडला नाही. त्यामुळे त्याच्या पालकांनी शिवाजीनगर पोलिसांत त्याची मिसिंग तक्रार केली होती. याप्रकरणी अपहरणाचा गुन्हा नोंदवून पोलिसांनी या मुलाचा शोध सुरु केला होता.

ही शोधमोहीम सुरु असताना या मुलाला शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. चौकशीत त्याचे बाबू शेख आणि त्याचा सहकारी साफडे ऊर्फ जारा यांनी अपहरण केले होते. त्याला जबदस्तीने तृतीयपंथी बनविले होते, त्यानंतर त्याला उपनगरीय लोकलमध्ये भीक मागण्यास प्रवृत्त केले होते. त्याला मुलीचे कपडे घालून इतर पुरुषासोबत शारीरिक संबंधासाठी प्रवृत्त केले होते.

तपासात आलेल्या या माहितीनंतर संबंधित आरोपीविरुद्ध पोलिसांनी अपहरणासह पिटा, पोक्सो तसेच तृतीयपंथी व्यक्ती अधिनियमच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल होताच आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली होती. ही शोधमोहीम सुरु असताना बाबू शेख हा वाशी येथे लपला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीनंतर प्रभारी पोलीस निरीक्षक भरत घोणे यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक रहाणे, बेळणेकर, नार्वेकर, देसाई, पोलीस हवालदार शिंदे, गायकवाड, तुपे, पोलीस शिपाई बोढारे, महिला पोलीस शिपाई सुतार, बागल यांनी वाशी परिसरातून बाबू शेखला अटक केली.

अटकेनंतर त्याला पुढील कारवाईसाठी शिवाजीनगर पोलिसांच्या स्वाधीन देण्यात आले आहे. तपासत त्याला सहा महिन्यांपूर्वी मुंबई शहरात अनाधिकृतपणे वास्तव केल्याप्रकरणी पोलिसांनी अटक केली होती. यावेळी त्याने मुंबई शहरात लाखो रुपयांची प्रॉपटी घेतल्याचे उघडकीस आले होते.








## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# अमेरिकेला महागात पडणार



अलीकडेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी कॅथॉलिक खिस्त्यांचे सर्वोच्च धर्मगुरु पोप लिओ (चौदावे) यांच्यावर केलेल्या टीकेमुळे जागतिक राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. या निमित्ताने धर्म आणि राजकारण यांच्या सीमारेषा पुन्हा एकदा चर्चेस आल्या आहेत. पाश्चात्त्य जगतातील धार्मिक संस्थांनी अनेकदा राजकीय आणि सामाजिक विषयांवर भूमिका घेतली आहे. त्यावर राजकीय नेत्यांनी प्रश्नही उपस्थित केले आहेत. असे असले, तरी ही टीका राजसत्तेच्या सर्वोच्च प्रमुखाने धर्मसत्तेच्या सर्वोच्च प्रमुखावर प्रथमच आणि तेही तिखट शब्दांत केली असल्याने ती व्यापक चचेर्चा भाग ठरते. काही दिवसांपूर्वी अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्धावर पोप लिओ यांनी तीव्र अप्रसन्नता व्यक्त केली. त्यांनी या युद्धाला अमानवी ठरवत 'देव कोणत्याही युद्धाला आशीर्वाद देत नाही', अशा शब्दांत अमेरिका आणि तिचे युद्धखोर राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांच्यावर टीका केली. आता हे युद्ध चालू होऊन किमान दीड महिना उलटून गेला आहे. त्याच वेळी पोप यांनी ही अप्रसन्नता का व्यक्त केली नाही?, हे कळायला मार्ग नाही. असो. ट्रम्प यांना कुठलीही टीका तशी नवीन नाही; परंतु ही टीका थेट खिस्ती धर्मसत्तेच्या सर्वोच्च नेत्याने आणि तेही ऐन युद्धकाळात केल्याने ती ट्रम्प यांच्या चांगलीच जिव्हारी लागली. त्याला ट्रम्प यांनी जे काही प्रत्युत्तर दिले आहे, ते वाचून अनेकांच्या भुवया उंचावल्या. त्याहीपेक्षा त्यांच्या प्रत्युत्तराची भाषा 'फादर ऑफ ऑल बॉंब'पेक्षा जहाल होती. यापूर्वीही पोप यांनी अमेरिका आणि युरोपीय देशांनी स्थलांतरितांच्या विरोधात घेतलेल्या आक्रमक भूमिकेवर मानवी अधिकारांच्या दृष्टीकोनातून टीका केली आहे. तेव्हाही ट्रम्प यांनी पोप यांना 'राष्ट्रांच्या सीमांचे रक्षण आणि स्थानिकांच्या रोजगाराचे संतुलन हे धार्मिक भावनांहून अधिक व्यवहार्य वास्तव आहे', असे प्रत्युत्तर दिले होते. तथापि ती टीका आणि आताची टीका यांत बराच भेद आहे. पोप यांनी आताची टीका एकट्या ट्रम्प यांच्यावरच केली. यातून 'या युद्धाला ट्रम्प हेच उत्तरदायी आहेत', असा संदेश जगभरात गेला आणि हीच ट्रम्प यांची दुखरी नस ठरली. ट्रम्प यांनी 'लिओ यांची गुन्हेगारी आणि अण्वस्त्रे यांविषयीची मवाळ भूमिका मला पटणारी नाही', अशा शब्दांत पत्रास प्रारंभ केला आहे. या पत्रात त्यांनी सर्व ठिकाणी पोप यांचा एकेरी उल्लेख केला आहे आणि हीच गोष्ट अनेकांना खटकणारी आहे. 'मीच बरोबर आणि पोप चुकीचे', असा त्यांच्या पत्राचा सारांश आहे. ट्रम्प यांच्या अहंकारी भूमिकेचे दूरगामी परिणाम होतील. राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक अशा विविध पातळ्यांवर त्यांचे विरोधी पडसाद उमटतील; कारण कॅथॉलिक हा केवळ एक धार्मिक समुदाय नसून युरोप, लॅटिन अमेरिका आणि आफ्रिकेतील अनेक देश यांच्या सामाजिक अन् राजकीय जाणिवांचा केंद्रबिंदू आहे. अशा परिस्थितीत इतक्या खालच्या पातळीवर जाऊन टीका करण्याची मोठी किंमत ट्रम्प यांना मोजावी लागू शकते. ट्रम्प यांच्या पोपद्रोहावर आक्षेप घेणारा इटली हा पहिला देश ठरला आहे. त्याने 'ट्रम्प यांची पोप यांच्याविरुद्धची भाषा अस्वीकारार्ह असून त्यांनी केलेली टीकाही अमान्य आहे', असे म्हटले आहे. युद्धभूमीवर सहकारी देशाने अशा प्रकारे भूमिका घेणे, ही अमेरिकेसाठी धोक्याची घंटा आहे. इटलीप्रमाणे आज ना उद्या फ्रान्स, जर्मनी, कॅनडा, स्पेन आदी देशांनाही पोप यांच्यावरील टीका मान्य नसेलच; पण अजून इटलीप्रमाणे त्यांनी ती व्यक्त केलेली नाही इतकेच! सांगायचे तात्पर्य हेच की, पोप यांच्यावरील टीकेमुळे ट्रम्प यांना काय राजकीय लाभ-हानी होईल?, हे वेगळे; परंतु दीर्घकालीन परिणाम मात्र अधिक गंभीर आहेत. जगभरातील खिस्तीबहुल देशांसाठी व्हॅटिकन हे श्रद्धास्थान आहे. त्यांच्या धार्मिक श्रद्धा या ठिकाणाशी जोडल्या आहेत आणि स्वतःच्या श्रद्धास्थानावर झालेली टीका कुणीही सहन करत नाही. त्यामुळे आज कदाचित खिस्ती देश अमेरिकेच्या विरोधात उघडपणे बोलणार नाहीत; पण त्यांच्या मनात हे धुमसत राहील. परिणामी दीर्घकालीन राजनैतिक तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. ट्रम्प यांनी त्यांच्या 'लेटर'मध्ये आणखी एक 'बॉंब' टाकला आहे. ते म्हणाले, ''लिओने (म्हणजे पोप लिओ यांनी) कृतज्ञ असायला हवे; कारण सर्वांना ठाऊक आहे की, त्यांची निवड एक धक्कादायक आश्चर्य होते. पोप होण्याच्या सूचीमध्ये त्यांचे नाव नव्हते. चर्चने त्यांना तेथे केवळ यासाठी बसवले; कारण ते अमेरिकी होते आणि त्यांना वाटले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी व्यवहार करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग असेल. जर मी 'व्हाईट हाऊस'मध्ये (अमेरिकेच्या राष्ट्रध्यक्षांचे निवासस्थान) नसतो, तर लिओ व्हॅटिकनमध्ये नसते!'' यावरून दोन गोष्टी प्रामुख्याने समोर येतात. ट्रम्प यांच्या विधानांमधून त्यांचा पोप यांच्या निवडप्रक्रियेवर प्रभाव असल्याचे दिसून येते. 'एखाद्या धार्मिक नेत्याच्या निवडीचे निषक काय असावेत?, हे निश्चित असते. ते सर्वच नियम पोप लिओ यांच्या निवडीच्या संदर्भात पाळले गेले आहेत का?', असा प्रश्न ट्रम्प यांच्या विधानांवरून कुणालाही पडेल. जणू ट्रम्प हे पोप यांच्या निवडीची तुलना राजकीय निवडणुकीतील सर्वसाधारण उमेदवारांशी करत असावेत. अर्थात् कुठला खिस्ती देश हे खपवून घेईल? 'व्हॅटिकन अमेरिकेला अनुकूल अशी भूमिका घेते', असा संदेशही ट्रम्प यांच्या विधानातून जगासमोर गेला आहे. यावरून काही खिस्ती देशांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. इटलीने केलेल्या निषेधाचे मूळ यात आहे. विशेष म्हणजे या गंभीर आरोपावर व्हॅटिकनकडून अद्याप तरी कुठलाही खुलासा आलेला नाही; मात्र ट्रम्प यांच्या या टीकेनंतर पोप लिओ यांनी स्वतःला या वादापासून लांब ठेवणे पसंत केले आहे. 'मी राजकारणी नाही आणि मला वाद घालायचा नाही', अशा आशयाची सामंजस्याची भूमिका घेत त्यांनी युद्धविरोधी भूमिकेवर ठाम रहाण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. एकूणच या वादाला सध्या 'ट्रम्पसत्ता विरुद्ध पोपसत्ता' असे स्वरूप आले आहे. या सर्व घटनाक्रमाचे सार हेच की, एकदा का सत्ता आणि कथित सामर्थ्य यांची हवा डोक्यात गेली की, सर्व जग तुच्छ वाटू लागते, स्वतःचे धर्मगुरुही चुकीचे वाटू लागतात. या टीकेसमवेत ट्रम्प यांनी प्रसारित केलेल्या चित्रात 'ट्रम्प येशू खिस्ताच्या रूपात असून भोवती दैवी प्रकाश आहे आणि ते एका व्यक्तीवर उपचार करत आहेत', असे दाखवले आहे. थोडक्यात 'मी म्हणजेच येशू खिस्त' असे त्यांना सांगायचे आहे का?, असा प्रश्न पडतो. रावणालाही अगदी असाच अहंकार झाला होता. तो स्वतःला 'अहं ब्रह्मास्मि'। समजत होता. शेवटी त्याचा नाश झाला. ट्रम्प महोदय यातून बोध घेऊन वेळीच सुधारतील, अशी आशा!

# सक्षम नारीशक्ती की निवडणुकीसाठी युक्ती!



महिला आरक्षण कायदा अर्थात नारी शक्ती वंदन कायदा-2023 दुरुस्तीसाठी केंद्र सरकारनं आजपासून संसदेचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे. आगामी लोकसभा-2029 निवडणुकीपासून या कायद्याची अंमलबजावणी करुन महिलांना कायदेमंडळात अधिकाधिक प्रतिनिधित्व देण्यासाठीच हे अधिवेशन बोलावल्याचं सरकारकडून सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षात, महिला आरक्षणाच्या आडून सोयीची मतदारसंघ पुनर्रचना करुन आगामी निवडणुकीत त्याचा फायदा उचलणं हाच या अधिवेशनाचा मुख्य उद्देश असल्याचा आरोप विरोधकांकडून होतोय.

केंद्रातील भाजपप्रणित सरकारनं मंगळवारी संविधान (एकशे सहावी दुरुस्ती) अधिनियम, 2023 (नारी शक्ती वंदन कायदा) मध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव मांडला. ही दुरुस्ती 16 ते 18 एप्रिलदरम्यान चालणाऱया संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केली जाईल. लोकसभा, राज्यांच्या विधानसभा, दिल्ली राष्ट्रीय राजधानी प्रदेश आणि केंद्रशासित प्रदेशांत महिलांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या महिलांसह) एक तृतीयांश आरक्षण देणं हा या दुरुस्ती विधेयकाचा उद्देश आहे. यावर चर्चेसाठी हे विशेष अधिवेशन बोलावण्यात आल्याचं सरकारकडून सांगण्यात येत आहे. तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुखांना पत्र लिहून हे विधेयक लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर करण्यासाठी पाठिंबा देण्याची विनंती केली. यामुळं एक नवा वाद निर्माण झाला आहे.

महिला आरक्षण कायदा 2023 (नारी शक्ती वंदन कायदा) च्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी जे घटनादुरुस्ती विधेयक आणलं जाणार आहे, त्याच्या जोडीलाच मतदारसंघ पुनर्रचना कायद्याशी संबंधित एक विधेयक आणि दिल्ली, जम्मू-काश्मीर व पुद्दुचेरी (विधानसभा असलेले तीन केंद्रशासित प्रदेश) यांच्यासाठीही एक विधेयक सादर केलं जाणार आहे. ही विधेयके संसदेत मंजूर झाल्यानंतर लोकसभेची सदस्यसंख्या सध्याच्या 543 वरून थेट 850 पर्यंत जाईल. 'संविधान (131वी सुधारणा) विधेयक, 2026'द्वारे हा बदल सुचवण्यात आला आहे. हे नवीन बदल 2029 च्या लोकसभा निवडणुकांपासून लागू होण्याची दाट शक्यता आहे. मात्र, लोकसभा मतदारसंघांच्या जागेतील ही वाढ जनगणनेच्या ताज्या आकडेवारीनुसार होणार नाही. तर, 2011 च्या अर्थात दीड दशक जुन्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचा केंद्र सरकारचा इरादा आहे. त्यालाच विरोधकांचा मुख्य आक्षेप आहे. महिला आरक्षण विधेयकाच्या आडून केंद्र सरकार हातचलाखी करत असल्याचा आरोप विरोधक करत आहेत.

भारताच्या विकासाचा प्रवास महिलांच्या सक्षमीकरणाशी घनिष्ठपणे जोडलेला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या आठ दशकांमध्ये सरकारच्या प्रयत्नांमुळे देशात महिला सक्षमीकरणात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. सरकारी-खासगी क्षेत्रात महिला कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. महिला कलाकार, खेळाडू आपल्या उल्लेखनीय कामगिरीने देशाला गौरव मिळवून देत पुढच्या पिढीला प्रेरणा देत आहेत. उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी अशा सर्वच क्षेत्रांमध्ये भारतीय महिला आपला प्रभावी ठसा उमटवत आहेत. महिलांना केवळ कल्याणकारी योजनांच्या लाभार्थी न मानता लैंगिक भेदभावाला सामोरे जाण्यापासून ते शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, उद्योजकता आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यापर्यंतच्या विविध उपक्रमांमुळे महिलांच्या जीवनात आमूलाग्र सुधारणा झाल्या आहेत. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत महिला विविध टप्प्यांवर आपलं महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. याच सर्व कालखंडात महिलांना पुरुषांच्या बरोबरीनं मतदानाचा अधिकार मिळाला. सरपंचपदापासून ते पंतप्रधान आणि राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचून महिलांनी केवळ आपल्या क्षमता सिद्ध केल्या नाहीत, तर देशाला कणखर नेतृत्त्वही दिलं. परंतु, कायदेमंडळात पुरुषांच्या बरोबरीनं अधिकार मिळायला महिलांना तब्बल आठ दशकांची प्रतीक्षा करावी लागली हेदेखील वास्तव आहे. विकसित भारत बनवण्यासाठी त्यात महिलांची भागीदारी आवश्यक असल्याचं म्हणत केंद्र सरकारनं नारी शक्ती वंदन कायद्यात दुरुस्तीचा घाट घातला आहे.

एका बाजूला हे विशेष अधिवेशन सुरू होत असताना दुसरीकडं पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळम, आसाम आणि पुद्दुचेरीत विधानसभा निवडणुकांचा ज्वर टिपेला पोहोचला आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात केरळम, आसाम आणि पुद्दुचेरीत मतदानही झालंय. तर, दुर्सया टप्प्यात तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये 23 आणि 29 एप्रिलला मतदान होणार आहे. ही सर्वच राज्यं भाजपच्या दृष्टीनं महत्त्वाची आहेत. मागच्या 12 वर्षांचा आढावा घेतल्यास एक एक करत भाजपनं संपूर्ण उत्तर, मध्य आणि पूर्वेकडील राज्यांचा ताबा घेतला आहे. कुठं स्वबळावर तर कुठं मित्रपक्षाच्या साथीनं भाजप सत्तेवर आहे. जवळपास 20 राज्यांमध्ये भाजपची सत्ता आहे. यामध्ये केवळ दक्षिणेकडील राज्याचा अपवाद म्हणावा लागेल. गेल्या अनेक वर्षांपासून दक्षिणेत बस्तान बसवण्यासाठी भाजपकडून प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू आहे. मात्र, पहिल्यांदा कर्नाटक आणि त्यानंतर तेलंगणा अशा दोन राज्यांनी भाजपचा डाव धुळीस मिळवला. या दोन्ही राज्यात कॉंग्रेसनं सत्ता मिळवताना दक्षिणेकडील स्थान अधोरेखित केलं होतं. सद्यस्थितीत उत्तर भारतातून कॉंग्रेस हद्दपार अन् दक्षिणेतून भाजप हद्दपार अशी दोन प्रमुख पक्षांची अवस्था आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल कॉंग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी भाजपला एकहाती झुंजवत आहेत. त्यामुळं पश्चिम बंगालसह तामिळनाडू आणि केरळम ही राज्यं ताब्यात घेण्यासाठी भाजपनं पूर्ण शक्ती पणाला लावली आहे. विरोधकही या शक्तीचा जोरदार प्रतिकार करताना दिसत आहेत. अशा निवडणुकीच्या रणधुमाळीत विरोधक गुंतलेले असताना विशेष अधिवेशन बोलावणं हे केवळ राजकीय फायद्यासाठीच केलं जात असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. या निवडणुका झाल्यानंतर हे अधिवेशन व खुली चर्चा करता आली नसती का असाही प्रश्न विरोधकांकडून विचारला जात आहे.

सुमारे 3 वर्षांपूर्वी जेव्हा केंद्र सरकारनं संविधानाच्या कलम 334-अ मध्ये दुरुस्ती करुन नारी शक्ती वंदन विधेयक-2023 आणलं तेव्हा विरोधकांनी एकमतानं या विधेयकाला पाठिंबा दिला होता. एवढंच नाही, तर हा कायदा लवकरात लवकर लागू करण्याची मागणीही केली होती. परंतु तेव्हा आगामी जनगणना आणि नव्या आकडेवारीनुसार मतदारसंघ पुनर्रचनेनंतर हा कायदा लागू करण्यावर केंद्र सरकारचा भर होता. भारतात सुमारे 5 वर्षांच्या विलंबानंतर आता कुठं जनगणनेला सुरुवात झाली आहे. दोन टप्प्यात ही जनगणना होईल. या जनगणनेची आकडेवारी आल्यानंतर देशाची लोकसंख्या किती कोटीनं वाढली हे कळेल, देशात कुठल्या जातीची किती लोकसंख्या आहे हेदेखील स्पष्ट होईल. लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करता येईल. त्याऐवजी 2011 च्या जुन्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न का केला जात आहे? केंद्राच्या नव्या समीकरणानुसार महिला आरक्षणासाठी जागा वाढवून देताना त्यांना पुरुष मतदारसंघांच्या जागाही कमी करायच्या नाहीत. त्यासाठी एक नवा फॉम्युर्ला केंद्रानं तयार केला आहे. या फॉर्म्युल्यानुसार प्रत्येक राज्याच्या सरसकट निम्म्या जागा वाढवून महिला आरक्षणासाठी नवे मतदारसंघ तयार होतील. उदाहरण. महाराष्ट्रात 48 जागांमध्ये 24 जागा वाढवून त्या 72 केल्या जातील. उत्तर प्रदेशच्या 80 जागांमध्ये 40 जागा वाढवून 120 केल्या जातील. पश्चिम बंगालच्या 42 जागांमध्ये 21 जागा वाढवून 63 केल्या जातील. अशाप्रकारे लोकसभेच्या सध्याच्या 543 जागा वाढवून त्या थेट 850 केल्या जातील. यामध्ये नेमकं तर्कशास्त्र काय? हे कळायला मार्ग नाही. कारण या फॉर्म्युल्यात ताज्या लोकसंख्येचा कुठलाही आधार घेतला जाणार नाही. केंद्र सरकारला जुन्याच जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करायची होती तर महिलांना आधीच सत्तेत वाटा देता आला असता. त्यासाठी 2023 पासून आजपर्यंत म्हणजे सुमारे 3 वर्षे वाट बघायची काहीच गरज नव्हती. आताही महिलांना योग्य प्रतिनिधित्त्व मिळवून द्यायचं असेल तर जनगणनेचे पूर्ण आकडे समोर येऊ द्यावेत. जातीय आकडेवारीनुसार महिलांना आरक्षण दिल्यानंतर मतदारसंघांची पुनर्रचना करायला काय हरकत आहे? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत असताना नारी शक्तीच्या नावाखाली आगामी निवडणुका जिंकण्यासाठीच केंद्र सरकारची ही युक्ती असल्याची टीका होणं स्वाभाविकच आहे.

## फेररचनेचा 'फेरा'



**विरोधकांच्या मागणीवर सरकारने भूमिका स्पष्ट केली नसली, तरी आजवर महिला आरक्षणाला झालेल्या विरोधातच त्याचे उत्तर आणि सरकारने या विधेयकांची सांगड घालण्याचे कारण दडले आहे.**

मतदारसंघांची फेररचना, आमदार-खासदारांची संख्यावाढ, त्यासाठी सन २०११च्या जनगणनेचा आधार आणि 'नारीशक्ती वंदन विधेयका'तील तरतुदी यावरील मतमतांच्या गलबल्यात संसदेच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सत्ताधारी व विरोधकांत चकमकी झडणे अपेक्षितच होते. विविध विषयांची मिसळ करून त्याला महिला आरक्षणाच्या विधेयकाचीही फोडणी देण्याचा प्रयत्न केंद्राने या निमित्ताने केला आहे. विशेषतः यातील घटनादुरुस्ती विधेयकासाठी सरकारला अतिरिक्त संख्याबळ लागेल. त्या पार्श्वभूमीवर कामकाज सुरू असताना अचानक 'नियम ६६' स्थगित करून या तिन्ही विषयांवर एकत्रच मतदानाची योजना सरकार पक्षाने आखली आहे. 'महिला आरक्षणाला पाठिंबा; पण फेररचनेला विरोध,' असा सर्व विषयांवर स्वतंत्र विचार करू पाहणाऱ्या विरोधकांची कोंडी करण्याचा सरकारचा मनसुबा लपून राहिलेला नाही. त्यामुळे काही तरतुदींना आक्षेप घेऊन फेररचनेच्या विरोधात मतदान केले, तर तो 'महिला आरक्षणालाही विरोध' अशा प्रचाराची संधी सत्ताधाऱ्यांना मिळू शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना जनता माफ करणार नाही,' अशा प्रचारसभेला साजेशा भाषणात त्याचेच प्रतिबिंब दिसले. त्यामुळे 'विधेयकांना मान्यता मिळाली, तर विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महिला आरक्षणाचा गाजावाजा करता येतो आणि फेटाळल्यास विरोधकांवर निशाणा साधता येतो,' अशा दुहेरी सापळ्यातून बाहेर पडून आपले आक्षेप-आग्रह तडीला नेणे ही विरोधकांपुढील कसोटी आहे.

# इस्त्रायल हाच भारताचा खरा मित्र

इराणने होर्मुझची खाडी ताब्यात घेऊन जणू जगाचा गळाच आवळला आहे. आखाती युद्धात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी फारसे काही बोलताना का दिसत नाहीत, ते शांत कसे असा प्रश्न पडतो. जो देश युद्धकाळात आपल्या बाजूने उभा राहतो तोच आपला खरा मित्र असतो. ह्यऑपरेशन सिंदूरह्णच्या वेळी सगळे मुस्लीम देश धार्मिक आधारावर पाकिस्तानच्या बाजूने उभे राहिले, नेहमी असेच होते. त्यावेळी इस्त्रायल भारताच्या बाजूने होता. त्यामुळे इस्त्रायल दुखावला जाणार नाही, याची काळजी घ्यावी लागते.



युद्धात तुमच्या बाजूने उभा राहतो, तोच तुमचा खरा मित्र असतो, बाकी सगळे व्यवहार असतात. कारण अगदी शत्रू देशांमध्येही व्यापारी संबंध असतात. भारताच्या शेजारी असलेले पाकिस्तान आणि चीन हे तसे पाहू जाता भारताचे शत्रू देश आहेत. पण त्यांच्यासोबत भारताचा व्यापार सुरू असतो. चीनसोबत तर भारताचा अतिशय मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू असतो. चीनच्या वस्तू या स्वस्त असतात, इतकेच नव्हे मोठ्या प्रमाणात कच्चा मालही भारत चीनकडून आयात करत असतो. भारतीय उत्पादनेही चीन आणि पाकिस्तानला निर्यात होत असतात. अर्थात, ज्या देशांच्या सीमा एकमेकांना लागून असतात, त्यांच्यात प्रामुख्याने ताणतणाव आढळून येतो. कारण प्रत्येकाला आपल्या सीमा वाढाव्यात अशी आकांक्षा असते. आपल्या प्रदेशाच्या सीमांचा विस्तार व्हावा ही मानवी आकांक्षा असते. त्यामुळे तसे प्रयत्न होत असतात, परिणामी दोन्ही बाजूंमध्ये ताणतणाव सुरू असतो. चीन आणि पाकिस्तान यांच्याशी भारताचा जो तणाव असतो त्याला कारण हाच सीमाविस्तार आहे. भारताचा विचार केला तर युद्धकाळात भारतासोबत उभे राहणारे दोन देश आहेत, रशिया आणि इस्त्रायल.

सध्या अमेरिका आणि इस्त्रायल यांचा इराणविरोधात संघर्ष सुरू आहे. सध्या त्यांच्यात तात्पुरता युद्धविराम झाला आहे. तरीही एकमेकांविरोधात कुरापती सुरू आहेत. हे युद्ध थांबविण्यासाठी इराण आणि अमेरिकेच्या प्रतिनिधींची नुकतीच पाकिस्तानात बैठक झाली. याला इस्त्रायलचा कुणी प्रतिनिधी उपस्थित नव्हता. इस्त्रायल आणि आखाती देश यांचे युद्ध हे इस्त्रायलच्या स्थापनेपासून म्हणजे इस्त्रायल हा वेगळा देश 1948 साली स्थापन झाला, त्यापासून सुरू आहे. ब्रिटिशांनी पुढाकार घेऊन आपल्या अंकीत असलेल्या पॅलेस्टाईनचे दोन भाग करून जगभरातील ज्यू लोकांना इस्त्रायल हा वेगळा देश दिला, पण त्यामुळे आखाती देश नाराज झाले. त्यांना तिथे ज्यू लोक नकोच होते. त्यातूनच पॅलेस्टाईन आणि इस्त्रायल हा संघर्ष उसळला. गेली अनेक वर्षे एका बाजूला मुस्लीम जग तर दुर्सया बाजूला इवलासा इस्त्रायल यांचा संघर्ष सुरू आहे. खरे पाहू गेल्यास मुस्लीम, ज्यू आणि खिस्ती यांचे मूळ पुरुष अब्राहम हे आहेत. त्यामुळे तसे पाहू गेल्यास तो भावकीचा वाद आहे. जेरुसलेम येथे या तीन धर्मियांचे पवित्र स्थान आहे. आपल्याला वेगळे राष्ट्र मिळावे यासाठी ज्यूंनी खूप पाठपुरावा गेला होता. वेगळी संघटना स्थापन करून जगभरातील ज्यू लोकांना संघटित करण्याचे काम केले. ज्यू लोक हे त्यांच्या मूळ भूमीतून परागंदा झाले होते. कारण त्यांच्यावर झालेल्या आक्रमणांमध्ये ते टिकू शकले नाहीत. ते जगभर विखुरले गेले. ते विविध देशांमध्ये राहत होते. भारतामध्येही काही ठिकाणी राहिले. महाराष्ट्रात अलिबाग येथे इसवी सनापूर्वी येऊन ते वसले. ते ज्या देशात गेले, त्यांनी तिथली भाषा आत्मसात केली, पण त्यांनी आपला ज्यू धर्म सोडला नाही. त्यामुळे ज्यावेळी त्यांना इस्त्रायलच्या रुपात नवीन राष्ट्र मिळाले तेव्हा जगभरात विखुरलेले ज्यू लोक इस्त्रायलला गेले. त्यांची ही वाढत जाणारी संख्या आणि संघटन आखातातील मुस्लीम देशांना डोकेदुखी वाटत आहे. त्यामुळे त्यांचा त्यांना कडवा विरोध आहे. सध्या सुरू असलेल्या युद्धांमध्ये अमेरिकेची इराणला मुख्य अट आहे, ती म्हणजे त्यांनी युरेनियम समृद्ध करणे बंद करावे आणि अणू कार्यक्रम बंद करावा. कारण यातून अणूबॉम्बची निर्मिती झाली तर त्याचा वापर इस्त्रायलवर होऊ शकेल. कारण मुस्लीम जग आणि इस्त्रायल यांच्यामध्ये किती कडवा संघर्ष आहे, तो अमेरिका 1948 सालापासून पाहत आहे.

ज्यू लोकांना ब्रिटिशांच्या पुढाकाराने इस्त्रायल हा अतिशय वाळवंटी भाग मिळाला, पण ज्यू लोक हे जरी विखुरलेले असले तरी ते अतिशय हुशार होते, त्यामुळे त्यांनी मोठ्या कष्टाने वाळवंटात एक आधुनिक राष्ट्र उभे केले. पहिल्या दिवसापासून त्यांना मुस्लीम राष्ट्रांनी विरोध केला आणि त्यांच्यावर आक्रमणे केली, पण त्यांना ते पुरुन उरले आहेत. इस्त्रायलमध्ये ज्यूंना पाय रोवायला दिल्यानंतर पुढील काळात ते आपला विस्तार करतील आणि आपल्याला भारी पडतील, ही भीती आखातातील मुस्लीम देशांना वाटते, कारण ज्यू लोक हे मुस्लीम देशातील लोकांच्या तुलनेने उच्चशिक्षित आणि आधुनिक आहेत. इतकेच नव्हे तर विविध देशांमध्ये ते भांडवलदार, सावकार आहेत. अनेक उद्योग आणि व्यापाराची सूत्रे त्यांच्या हाती आहेत. अमेरिकेतील अनेक मोठ्या उद्योगांची सूत्रे ज्यूंच्या हाती आहेत. त्यामुळे इस्त्रायल हे राष्ट्र म्हणून उभे राहण्यासाठी ज्यू लोकांना अमेरिकेची मोठी मदत झालेली आहे. त्यामुळे इस्त्रायलचा जो मुस्लीम जगाशी संघर्ष सुरू आहे, त्यात अमेरिकेला उडी घ्यावी लागली.

पाकिस्तान सोडला तर आज कुठल्याही मुस्लीम देशाकडे अणूबॉम्ब नाही. अर्थात, पाकिस्तानकडे अणूबॉम्ब आहे की नाही, हीदेखील एक शंका आहे. त्याचसोबत अणूबॉम्ब टाकण्यासाठी जी यंत्रणा लागते ती त्यांच्याकडे आहे की नाही, या सगळ्याच बाबतीत बोंब आहे. पण आमच्याकडे अणूबॉम्ब आहे, असे सांगून ते भारतावर दबाव आणत असतात. जरी त्यांच्याकडे अणूबॉम्ब असला तरी पाकिस्तान हे अमेरिकेच्या ताटाखालचे मांजर आहे. रशिया पूवीर्पासून भारताच्या बाजूने राहिल्यामुळे त्यांचा कडवा विरोधक अमेरिका हा पाकिस्तानच्या निर्मितीपासून त्यांना आर्थिक आणि शस्त्रास्त्रांची मदत करत आलेला आहे. सध्याच्या आखाती युद्धात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा पाय चांगलाच अडकलेला आहे. तो सोडवून घेण्यासाठी त्यांनी पाकिस्तानला पुढे केले. पाकिस्तानमध्ये इराण आणि अमेरिकेच्या प्रतिनिधींची बैठक घेतली, पण इराण काही अमेरिकेच्या गळाला लागला नाही. त्यामुळे ट्रम्प यांची मोठी फटफजिती झाली. ट्रम्प यांना नोबेल पुरस्काराचे वेड आहे. तो आपल्याला मिळावा म्हणून जगातील युद्ध थांबवण्यासाठी पुढाकार घेतात. पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध आपण थांबवले, असे त्यांनी अगोदरच सोशल मीडियावर जाहीर करून टाकले. कारण त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळवायचा आहे, तो काही केल्या मिळत नाही. आताही त्यांना आपण इस्त्रायल आणि आखाती देशांमधील युद्ध थांबवले याचे श्रेय घ्यायचे आहे. पण इस्त्रायल आणि इराण हे कडवटपणे लढत असल्यामुळे ट्रम्प यांची मोठी कोंडी झाली आहे.

दुसरी बाजू अशी आहे, इतके सगळे आखाती देशात होत असताना आपण जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहोत, असे दावा करणारे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी शांत का आहेत, मोदी मध्यस्थी का करत नाहीत? कारण भारत हा असा देश आहे, ज्याला सगळ्यांचीच गरज पडते. आखाती देशांकडून तेल हवे, तिथे १ कोटी भारतीय काम करत आहेत. अमेरिकेमध्ये लाखो भारतीय महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. अमेरिकेत भारताकडून मोठी निर्यात होत असते. इस्त्रायलकडून भारताला आधुनिक शस्त्रसामुग्री विकत मिळत असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या युद्धात प्रामुख्याने कुणालाच दुखवायचे नाही. त्यामुळे त्यांनी सगळ्याच देशांना शांततेचे आवाहन केले आहे. कुठल्या एका देशाची ठामपणे बाजू घेतलेली नाही. अगदी भारतातील मुस्लीम इस्त्रायलचा सातत्याने विरोध करत असतात. अर्थात, त्यामागे इस्त्रायलच्या हल्लांमध्ये ठार होर्णाया गाजापट्टीतील लोकांची कळकळ आहे, तशीच त्यामागे धार्मिक भावना आहे. कारण सगळे आखाती देश हे मुस्लीम आहेत, तर ज्यू हे वेगळ्या धमार्चे आहे. या युद्धात कुठलीही भूमिका घेताना पंतप्रधान या नात्याने नरेंद्र मोदींना आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार करावा लागत असावा. जेव्हा भारताचे पाकिस्तानविरुद्ध युद्ध होते, तेव्हा जगातील सगळे मुस्लीम देश धर्माच्या आधारे पाकिस्तानच्या बाजूने उभे राहतात. अलीकडे 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळीही तेच दिसले. मोदींनी हे लक्षात घेऊन इस्त्रायलच्या विरोधात जाणार नाही, अशी भूमिका घेतली. इराण हा काही भारताला कच्चे तेल देणारा एकमेव देश नाही, भारत विविध देशांकडून कच्चे तेल आणि वायू घेतो. त्यासाठी पैसे मोजतो.

अमेरिकेत काही लाख भारतीय लोक राहतात, त्यांचाही विचार मोदींना करावा लागतो. कारण ट्रम्प हा माथेफिरू माणूस आहे. पाकिस्तान आणि अमेरिकेची मैत्री आहे, पण पाकिस्तान आणि इस्त्रायलची मैत्री कधीच होऊ शकत नाही. त्यामुळे दुश्मन का दुश्मन दोस्त, ही नीती मोदी वापरत असावेत. पाकिस्तान हीच नीती चीनविषयी वापरतो, कारण तो भारताचा दुश्मन. इस्त्रायल काही स्वतःहून आखाती देशांवर हल्ले करत नाही, जे आखाती देश किंवा त्यांच्या हमास, हुती, हिजबुल्लासारख्या दहशतवादी संघटना हल्ले करतात तेव्हा इस्त्रायल त्याला प्रत्युत्तर देते. जसे पाकिस्तानने पाळलेल्या दहशतवादी संघटना भारतात घातपात करतात किंवा हल्ले करतात तेव्हा भारत त्याला प्रत्युत्तर देतो. भारत स्वतःहून पाकिस्तानवर कधी हल्ला करत नाही. तसाच इस्त्रायल स्वतःहून आखाती देशांवर कधी हल्ले करत नाही. त्यामुळे एकूणच जगातील राजकारण पाहता युद्धाच्या वेळी भारतासोबत उभा राहणारा इस्त्रायल हाच भारताचा खरा मित्र आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

# चटकदार रीव्हर्स वडापाव



**साहित्य :** ४ व्हाइट ब्रेड स्लाइस, बेसन, हिरवी चटणी, लाल सुकी चटणी, ६ पाकळ्या बारीक चिरलेला लसूण, आल्याचा तुकडा ठेचलेला, कढीपत्ता, १ कांदा बारीक चिरलेला, बेकिंग सोडा, हिंग, जिरे, मोहरी, हिरवी मिरची बारीक चिरलेली, मीठ, ४ उकडून कुस्करलेले बटाटे, कोथिंबीर बारीक चिरलेली, तेल.

**भाजीची कृती :** प्रथम पॅनमध्ये १ टेबलस्पून तेल गरम करायला ठेवा. तेल तापले की, त्यात जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग, लसूण, आले, हिरवी मिरची, कांदा व हळद घालून नीट ढवळून एक करा. कांदा लालसर झाला की त्यात कुस्करलेला बटाटा घाला व मिश्रण नीट परतवत राहा. नंतर आवश्यक तेवढे मीठ घाला आणि झाकण ठेवून एक वाफ काढा. मग कोथिंबीर घाला व गॅस बंद करा.

**बेसनाचा घोळ :** एका बाऊलमध्ये बेसन घ्या. त्यात १/२ टीस्पून प्रत्येकी बेकिंग सोडा, हळद व मीठ घाला. आवश्यकतेनुसार पाणी घालून बेसनाचा घोळ तयार ठेवा.

**सँडविच कृती :** ब्रेड स्लाइसच्या कडा कापून घ्या व चार चौकोनी तुकडे करा. एका तुकड्यावर हिरवी चटणी लावा व त्यावर लाल चटणी टाका. दुसरा ब्रेडचा तुकडा त्यावर ठेवा. अशाप्रकारे सर्व सँडविच करून घ्या. आता पॅन गॅसवर गरम करायला ठेवा व त्यात थोडे तेल घालून पसरवा. तेल तापल्यावर तयार छोटे सँडविच दोन्ही बाजूनी भाजून घ्या.

**कृती :** वरील तयार भाजीचे गोळे करून तयार ठेवा. एक गोळा घेऊन हातावर त्याची पाती करा व पातीवर वरील सँडविच ठेवा. वरून दुसरी पाती ठेवा व सँडविच बटाट्यानी नीट बंद करून हलक्या हाताने दाबा. अशाप्रकारे सर्व सँडविचचे वडे तयार करून घ्या. कढईत तळण्यासाठी मध्यम आचेवर तेल तापायला ठेवा. आता प्रत्येक वडा बेसनाच्या घोळात बुडवून तेलात तळून घ्या व मधून कापून चटणी किंवा सॉसबरोबर गरम गरम सर्व्ह करा.

# केसांना तेल लावताना घ्या 'ही' काळजी

**केसांचं आरोग्य जर निरोगी राखायचं असेल तर त्यांची नीट काळजी घेणं गरजेचं आहे. लांबसडक, काळेभोर केस असावेत अशी प्रत्येक तरुणीची इच्छा असते. मात्र असे केस मिळवण्यासाठी केसांना दररोज तेल लावणं गरजेचं आहे. केसांना दररोज तेल लावल्यामुळे केसांची मुळं मजबूत होतात. त्यासोबतच डोक्यावरील त्वचेसाठीही तेल तितकंच गरजेचं असतं. तेलामुळे डोक्यावरील त्वचेला पोषण मिळतं. तसंच रक्तपुरवठाही सुरळीत होतो.**

**केसांसाठी**

नारळाचं तेल, बदामाचं तेल किंवा मोहरीचं तेल विशेष गुणकारी असतं. या तेलाचा वापर केल्यामुळे केस काळेभोर आणि घनदाट होण्यास मदत होते. मात्र तेलाचा वापर करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. चला तर मग जाणून घेऊयात तेल लावताना कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी -

**डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे**

तेल लावताना डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे विशेष गरजेचं आहे. त्यासोबतच केसांच्या मुळाकडेही तितकंच लक्ष द्यावं लागतं. केसांची मूळ मजबूत असतील तर केसांची वाढ लवकर होते. त्यासोबतच केसांची गळतीदेखील होत नाही. डोक्यावर नारळाच्या तेलाने मसाज केल्यास याचा परिणाम लवकर दिसून येतो.



**रोज केसांना मसाज करावा**

केसांच्या आरोग्यासाठी केसांना केवळ तेल लावणं हा उपाय नाही तर तेल लावण्यासोबतच केसांच्या मुळांना मसाज करणेदेखील गरजेचं आहे. मसाज करण्यासाठी शक्यतो कोमट तेलाचा वापर करावा. कोमट तेलाने मसाज केल्यामुळे केसांची मुळं बळकट होतात.

**तेल लावणं कधीही विसरू नका**

केसांना तेल लावल्यामुळे अनेक वेळा केसांमध्ये चिकटपणा निर्माण होतो, अशी तक्रार महिला वर्गातून येत असते. त्यामुळे अनेक वेळा तरुणी केसांना तेल लावण्याचं टाळतात. मात्र केसांना तेल न लावण्याची चूक कधीही करू नका. केसांच्या वाढीसाठी तेल लावणं महत्त्वाचं आहे. घराच्या बाहेर पडल्यानंतर केसांना धूळ, माती, प्रदूषण या साऱ्या घटकांचा सामना करावा लागतो. त्यामुळे केस कोरडे होतात. परिणामी केसांचं गळण्याचं आणि केस तुटण्याचं प्रमाण वाढतं. या साऱ्या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी केसांना तेल लावणं गरजेचं आहे.



**तेल किंवा शाम्पूचा अतिरेकही करू नये**

कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाली तर त्याचे दुष्परिणामही सहन करावे लागतात. त्यामुळे तेल असो किंवा शाम्पू दोघांचाही वापर प्रमाणात असावा. जर डोक्यावर तेलाचा जास्त मारा झाला तर डोक्यावरील भार वाढतो आणि केसदेखील तेलकट दिसून लागतात.

# उन्हाळ्यात फूड पॉइजनिंगपासून बचावासाठी ४ प्रभावी उपाय

**उन्हाळ्यात बाहेरचा आहार घेणे अनेकदा त्रासदायक ठरतं. उन्हाळ्यात खाद्यपदार्थ लवकर खराब होतात आणि यामुळेच फूड पॉइजनिंगचा त्रास उद्भवतो. अशाच काही टिप्स लक्षात ठेवल्या तर यापासून वाचता येऊ शकतं.**

- **लिंबाचे सेवन**

लिंबात अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीबेक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुण आढळतात. म्हणून लिंबू पाणी पिण्याने बॅक्टेरिया मरतात. आपण रिकाम्यापोटी लिंबू पाणी पिऊ शकता. शक्य असल्यास गरम पाण्यात लिंबू पिळून पिऊ शकतात. परंतु पाणी स्वच्छ असावे याची काळजी घेणे अती आवश्यक आहे.

- **तुळशीचे सेवन**

तुळशीत आढळणारे अँटीमिकोबियल गुणधर्म सूक्ष्मजीवांच्या सामोरे जातात. तुळस अनेक प्रकारे आहारात सामील करता येईल. दह्यात तुळशीचे पान, काळीमिरी आणि मीठ घालून सेवन करू शकता किंवा चहात तुळशीचे पान टाकून सेवन करू शकता.

- **दह्याचे सेवन**

दही एका प्रकारे अँटीबायोटिक आहे आणि यात जरा काळं मीठ घालून खाल्ल्याने आराम मिळेल.

- **लसणाचे सेवन**

लसणात अँटी फंगल गुण असल्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या १-२ पाकळ्या पाण्यासह घेतल्याने आराम मिळेल.



# बहुगुणकारी ताडगोळे

**ताडगोळे हे फळ वर्षामध्ये ठरावीक ऋतूमध्ये, म्हणजे उन्हाळ्यामध्ये उपलब्ध असणारे फळ आहे. याची चव काहीशी शहाळ्यातील मलई प्रमाणे लागत असून, चवीला हे फळ मधुर असते. इंग्रजी भाषेमध्ये 'आईस ॲपल' या नावाने ओळखले जाणारे हे फळ आरोग्याच्या दृष्टीने देखील अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. या फळाला मुंजाल या नावानेही काही प्रांतांमध्ये ओळखले जाते. या फळाचे आरोग्यासाठी असणारे फायदे जाणून घेऊ या...**



**ज्यांना** वजन घटवायचे असेल, त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे आणि यामध्ये असलेल्या रसामुळे भूक शमण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार काही ना काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरशी निगडित काही समस्या असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उपयुक्त आहे. या फळामध्ये पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून त्यामुळे लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनामुळे शरीराला श्रम करण्यासाठी आवश्यक ताकद आणि ऊर्जा मिळत असते. या फळाच्या सेवनामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्यामुळे दिवसभराच्या कामासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनाने मिळत असते.

या फळाच्या सेवनाने शरीराला आवश्यक असलेले क्षार आणि इतर पोषक तत्त्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यामुळे सतत पुरळ येत असेल किंवा ज्यांना या दिवसांमध्ये चेहऱ्यावर सतत मुरुमे येत असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगप्रतिरोधी तत्त्वे असून, विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले गेले आहे. या फळामध्ये अँथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे पुरेपूर मिळवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे.

# कोणतेही ॲप डाऊनलोड करताना राहा सावध!

## 'या' ४ गोष्टींकडे द्या विशेष लक्ष, नुकसान होणार नाही

**युजर्स** गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे कधी-कधी धोकादायक ठरू शकते. कसे ते जाणून घ्या. आजकाल प्रत्येकाकडे स्मार्टफोन असतो आणि त्यामध्ये अनेक ॲप्स असतात. या ॲप्समुळे रोजची अनेक महत्त्वाची कामे कुठल्याही अडचणींशिवाय पार पडतात. अनेक जण गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहीत आहे का की, काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. तुम्ही अँड्रॉइड युजर असाल तर ही विशेष माहिती नक्कीच तुमच्या कामी येईल. पाहा डिटेल्स.



**हे असू शकते धोकादायक**

काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. कारण, गुगल प्ले स्टोअर मालवेअर आणि हॅकर्ससाठी ॲप्स फारसे स्कॅन करत नाही. अशा परिस्थितीत गुगलच्या स्टोअरवर मालवेअर प्रभावित ॲप्स असण्याची शक्यता आहे. तुम्ही हे ॲप डाऊनलोड केल्यास ते तुमचा वैयक्तिक डेटा चोरू शकतात. हे तुमची आर्थिक ओळखपत्रे देखील चोरू शकतात.

**असे सुरक्षित रहा**

तुम्ही डाऊनलोड करत असलेले ॲप तुम्हाला कोणत्या पर्मिशन्स विचारतात याकडे नेहमी लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ- तुम्ही एडिटिंग ॲप डाऊनलोड केल्यास ते ॲप तुम्हाला स्टोरेज, कॅमेरा, मायक्रोफोन आणि फोटो गॅलरी यासाठी परवानगी मागते. पण त्या ॲपला कोणत्या परवानग्या हव्यात याकडे तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. जेव्हाही आपण एखादे ॲप डाऊनलोड करतो तेव्हा त्याचे रिव्ह्यू नक्की वाचा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, लोक त्यांच्या ॲपच्या अनुभवावर आधारित रिव्ह्यू देतात. तुम्हाला ॲपचे वाईट रिव्ह्यू आढळल्यास ॲप डाऊनलोड करू नका.

जेव्हा तुम्ही एखादे ॲप डाऊनलोड करता, त्याआधी ते ॲप किती वेळा डाऊनलोड केले आहे ते पहा. ही तपासणी करणेदेखील महत्त्वाची आहे. कारण, जितक्या जास्त लोकांनी ॲप डाऊनलोड केले आहे तितकाच ॲपवर अधिक विश्वास निर्माण होतो.

गुगल प्ले स्टोअरवर प्रत्येक ॲप निर्माता त्यांच्या ॲपबद्दल तपशील देतो. त्याचा स्रोत काय आहे हेदेखील सांगतो. जर तुम्हाला स्रोत योग्य वाटत असेल किंवा तपशील बरोबर असतील तरच ॲप डाऊनलोड करा.

**फेफरे (फिट्स) हा आजार आपल्या मेंदूशी संबंधित आहे. आपल्या मेंदूमध्ये अतिसुक्ष्म वाहिन्या असतात, त्यांना न्यूरॉन असे म्हटले जाते. न्यूरॉन आपापसात नेहमी संपर्कात असतात. एकमेकांना संदेशाचे आदानप्रदान करत असतात. संदेश वहन करण्याचे कार्य इतक्या प्रचंड वेगाने होत असते की, त्याने आपल्या मेंदूत रासायनिक व विद्युत तरंग निर्माण होतात. परंतु, एखाद्या संदेशाचे व्यवस्थित वहन न होता तो वाहिनीत अडकून पडतो. मेंदूचे संतुलन बिघडते व त्यामुळे आपल्याला फिट्स येतात. पण घाबरून जाऊ नका. फिट्सवर घरगुती उपचार आहेत.**

# फिट्स आल्यास घाबरू नये

**फिट्स** दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळाची नसते. ती केव्हाही व कोणत्याही वयाच्या व्यक्तीला येऊ शकते. अचानक आपल्याला चक्कर येऊन आपण जमिनीवर पडतो व शुद्ध हरपते. फिट्स आल्यानंतर आपल्या हातापायात कंप निर्माण होतात. तोंडातून फेस येतो. वारंवार फिट्स येत असेल तर आपल्याला खालील टिप्स उपयोगी पडू शकतात.

- अक्कलकाढा १०० ग्रॅम व लिंबू सत्त १०० ग्रॅम यांचे मिश्रण मधामध्ये एकजीव करून ५ ग्रॅम प्रतिदिन सकाळी काहीही न खाण्यापूर्वी चाखल्याने फिट्स येणे कायमचे दूर होते.
- सालवटीचे चूर्ण एक ग्रॅम प्रतिदिन मधासोबत चाखावे. त्यानंतर दूध प्यावे. असे नियमित केल्याने जुनाट फिट्स दूर होतात.
- शुद्ध हरपलेल्या व्यक्तीला लसूण कुटून वास दिल्यास तो शुद्धीवर येतो.
- रोज ३-५ लसणाच्या पाकळ्या दुधात टाकून ते प्यायल्याने फिट्स येत नाहीत.

# आरामदायक 'ट्रेंडी' पँट

**फॅशनच्या** जगात महिलांसाठी पँटचे पुनरागमन झाले आहे. पॅरिस फॅशन शो असो की लक्मे फॅशन वीक सगळीकडे पँट्स परिधान केलेल्या मॉडेल दिसू लागल्या आहेत. एवढंच नव्हे तर फॉर्मलशिवाय याचा उपयोग कॅजुअल्समध्ये देखील होताना दिसत आहे.

सध्या कॉर्पोरेट कल्चरमुळे कपडे घालण्याच्या पद्धतीत कमालीचा बदल जाणावत आहे. मुली फॅशनसोबतच आरामालाही महत्त्व देत आहेत. म्हणूनच जीन्स-ट्राऊजरसारखे कपडे मुलींची पहिली पसंत झाली आहे. पिकनिक, आऊटिंग किंवा वीकेंडला जीन्स परिधान करताना दिसत आहेत. पण मीटिंग, कॉन्फरन्स, ऑफिशियल पार्टी किंवा सेमिनारच्या वातावरणात हे फिट बसत नाही. म्हणूनच मुलींनी आता पँट-ट्राऊजरला प्रमुख पोशाखांमध्ये सहभागी केले आहे. त्यातही विविध प्रकार आहेत. - ट्राऊजर, सिक्स पॉकेट, कार्गो, बूट कट आदी.



तुम्ही ऑफिस व्यतिरिक्त टी पार्टी किंवा डिनर पार्टीत सिल्क शर्टासोबत पँट परिधान करू शकता. पँट आरामदायक असल्यामुळे हल्ली मोठ्या इन्स्टिट्यूटनी शर्ट-पँट हा युनिफॉर्म म्हणून स्वीकारला आहे. एअरलाइन्स, हॉस्पिटलच्या व्यतिक्ति काही बँका आणि कॉलेजमध्ये आता मुली युनिफॉर्म म्हणून पँट-शर्ट परिधान करायला लागल्या आहेत. त्याने स्मार्टनेस वाढतोच आणि धावपळीची कामे सोपी होतात. पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसते. तसेच त्यावर बीडसची माळ, डायमंड नेकलेस किंवा नेकपीस, ब्रेसलेट, लेदर बेल्ट, कॉर्पोरेट बॅग्जपासून क्लच आणि पर्स हेही मॅच होते. पँट परिधान केल्यास लेदर शूज, सँडल, ट्रेंडी चप्पलसुद्धा परिधान शकता. त्याचबरोबर आपण पिकनिक आणि खेळण्यासाठी कार्गो किंवा सिंपल बूट कट देखील वापरू शकता.

**पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसतो.**



# वेळ सत्कारणी लावा

**बयापैकी** श्रीमंत असलेल्या कुटुंबाच्या काही सवयी असतात. विशेषतः वृद्ध स्त्रियांना पेपर वाचायचा असतो. सकाळ-संध्याकाळ बाहेर फिरून यायचे असते. ठरावीक पदार्थाचा आस्वाद घ्यायचा असतो. वैयक्तिक अशी त्यांची कामे त्यांना करायची असतात. इतकेच नव्हे; तर आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठी व्यायामही करायचा असतो. तेवढे पथ्यही त्यांना पाळायचे असते. वेळच्या वेळी औषध घेणे आणि आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सोबतीला कोणी मदतनीस स्त्री मिळाली तर ती त्यांना हवी असते. ज्यांना अशा सेवेत रूची आहे, त्यांना ही कामे करता येतील.

आई-वडिलांकडे लक्ष देता यावे म्हणून काही मुले-मुली खासगीरीत्या नर्स ठेवत असतात. पण ही नर्स फक्त आरोग्याची देखभाल करते. आपण पुढाकार घेतला तर सोप्या गोष्टी करता येणे शक्य आहे.



# वाढतं वजन थांबवायचंय?

## मग आहारात करा या घटकांचा समावेश

**बदलत्या जीवनशैलीमुळे वाढतं वजन ही प्रत्येकाची समस्या झाली आहे. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्याचा अनेक जण वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत असतात. अनेक वेळा डाएट करूनही वाढलेल्या वजनाला आळा बसत नाही. अशा वेळी आहारामध्ये वजन कमी करण्यास मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश करायला हवा. या पदार्थांच्या सेवनामुळे वारंवार लागणाऱ्या भुकेला आळा बसतो.परिणामी वजन लवकर वाढत नाही. असेच काही पदार्थ रुपम सिन्हा यांनी सांगितले आहेत.**

**लाल मिरची**

रोजच्या जेवणाला झणझणीतपणा येण्यासाठी अनेक वेळा गृहिणी भाजी, आमटीमध्ये लाल मिरची किंवा लाल तिखटाचा वापर करतात. मात्र जेवणाची रंगत वाढवणारी लाल मिरची वजन कमी करण्यासाठीदेखील तितकीच उपयोगी आहे. लाल मिरचीमध्ये कॅप्सॅकीन संयुग असतात. कॅप्सॅकीनमुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. परिणामी वाढत्या वजनाला आळा बसतो.

**लसूण**

एखाद्या पदार्थाला खमंग फोडणी द्यायची असेल लसूण गरजेचाच आहे. मात्र लसणाचा उपयोग केवळ जेवणासाठीच होत नसून आजारपणातही होतो. अनेक वेळा आजारपणामध्ये लसणाचा वापर औषध म्हणून केला जातो. त्याप्रमाणेच वजन कमी करण्यासाठीदेखील लसणाचा उपयोग होतो. जेवणामध्ये लसणाचा समावेश असेल तर जेवताना पोट भरलंय ही भावना मस्तिष्कापर्यंत पोहोचवण्याचं काम लसूण करतो. त्यामुळे पोट भरल्यानंतर आपण आपोआप जेवायचं थांबवतो. त्यामुळे आहारात लसणाचा समावेश करायला हवा. त्यासोबतच रक्ताच्या गुठळ्या होण्यापासून लसूण मदत करतो. तर हृदयाचे आरोग्यही नीट राहते.

**लाल आणि हिरवी मिरची**

मसाल्याच्या पदार्थांमधील महत्त्वाचा घटक म्हणजे मिरची. लाल मिरचीप्रमाणेच सुकी लाल मिरची किंवा हिरवी मिरची यांचाही तितकाच शरीराला फायदा होतो. मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, सीसोबतच बीटा कॅरोटिन असतं. त्यामुळे योग्य प्रमाणात मिरचीचं सेवन केलं तर पचनक्रिया सुधारते आणि भूक नियंत्रणात राहते.

**दालचिनी**

भूक नियंत्रणात ठेवण्याचं महत्त्वाचं काम दालचिनी करत असते. दालचिनीमुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. त्यासोबतच दालचिनीच्या सेवनामुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. दालचिनीमुळे धमन्यांचं कार्यही सुधारते आणि शरीरातील वाढलेल्या कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात आणली जाते.

**कोकम (आमसूल)**

आंबट, चटपटीत अशी चव असणाऱ्या कोकमाचे अनेक फायदे आहेत. भूक नियंत्रणात आणण्यासाठी कोकमचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे जेवणापूर्वी रोज एक कोकम खावं.



# चव वाढवणाऱ्या चक्रीफुलाचे असेही गुणकारी फायदे

**गरम मसाल्यांसाठी प्रसिद्ध असलेलं राष्ट्र म्हणजे भारत. त्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या स्वयंपाक घरामध्ये गरम मसाल्याचे पदार्थ हमखास आढळतात. जेवणाची चव वाढवणाऱ्या या पदार्थांपैकी काहींचा वापर आजीबाईच्या बटव्यासाठीही केला जातो. त्यामुळे चवीसोबतच हे पदार्थ गुणकारी असल्याचं दिसून येतं. मसाल्याच्या पदार्थांमध्ये महत्त्वाचा मानला जाणारा घटक म्हणजे चक्रीफूल. चक्रीफूल केवळ मसाल्याची चव वाढवत नसून त्याचे अन्यही काही गुणधर्म आहेत. इशा त्यागी यांनी चक्रीफुलाचे काही गुणधर्म सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे**

**वाढत्या वयाची लक्षणे थांबवण्यासाठी**

वय वाढायला लागलं की त्याच्या खुणा चेहऱ्यावर आपोआप दिसू लागतात. त्यामुळे अनेक वेळा तरुणी किंवा महिला प्रसाधनांचा वापर करून वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचा प्रयत्न करतात. मात्र आपल्या आहारात समावेश केलेल्या पदार्थांमुळेदेखील ही समस्या टाळता येऊ शकते. रोजच्या जेवणामध्ये वापरण्यात येणाऱ्या मसाल्यामध्ये चक्रीफूल हे महत्त्वाचं काम करत असतं. चक्रीफूल वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचं काम करतं. यामध्ये व्हिटॅमिन 'ए' आणि 'सी'चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते. त्यासोबतच त्यात अँटीऑक्सिडंटचे गुणही असतात. चक्रीफुलामध्ये शरीरातील फ्री रॅडिकल्सला नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे वाढत्या वयाची लक्षणं रोखण्याचं काम चक्रीफूल करते.



**सर्दी-खोकल्यावर गुणकारी**

कोणत्याही ऋतूमध्ये होणारा आजार म्हणजे सर्दी आणि खोकला. काही जणांना थंड पदार्थांचं सेवन केल्यानंतर लगेच सर्दी-खोकल्याची समस्या निर्माण होते. अशावेळी चक्रीफूल हे फायदेशीर ठरते. चक्रीफुलामध्ये थाइमो आणि एथोल याचे गुणधर्म असतात. त्यामुळे सर्दी किंवा खोकल्यावर चक्रीफूल गुणकारी आहे. त्यासोबतच शरीरामध्ये उष्णता वाढवण्याचं काम चक्रीफूल करते.

**पचनक्रिया सुधारते**

उशिरा जेवण झाल्यामुळे किंवा एखाद्या वेळी चुकीचे पदार्थ खाल्ल्यामुळे अनेक वेळा अपचन, पोटात गॅस होणे, पोटदुखी या सारख्या समस्या निर्माण होतात. मात्र या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चक्रीफूल फायदेशीर ठरते. चक्रीफुलामुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे आपल्या आहारात चक्रीफुलाचा समावेश करायला हवा.

# ठाण्यात अब कैसे लटकाया...!

## एक नाही तर ४ शासकीय कार्यालयांना बाप-लेकीनं लावला चुना

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड यांना थेट आव्हान देणारे युनूस शेख आणि त्यांच्या कन्या, नगरसेविका सहर शेख सध्या मोठ्या कायदेशीर कचाट्यात सापडल्या आहेत. सहर शेख यांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा खळबळजनक अहवाल ठाणे तहसीलदार उमेश पाटील यांनी दिला असून, यामुळे त्यांचे नगरसेविका पद रद्द होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

निवडणूक निकालानंतर 'कैसे हराया' या आपल्या वक्तव्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणाऱ्या सहर शेख यांच्यावर आता गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. तक्रारदार जावेद सिद्दीकी यांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर प्रशासकीय चौकशीत धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. तहसीलदार उमेश पाटील यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, सहर शेख यांनी एक-दोन नव्हे तर तब्बल चार शासकीय कार्यालयांची दिशाभूल केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तपासात असे निष्पन्न झाले आहे की, सहर शेख या मूळच्या उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील रहिवासी आहेत.



### कोणत्या चार यंत्रणांची दिशाभूल?

आपल्या राजकीय फायद्यासाठी प्रशासकीय नियमांना हरताळ फासून बोगस कागदपत्रांचा आधार घेतल्याचे आता चौकशीत स्पष्ट होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सहर शेख यांनी खालील चार महत्त्वाच्या संस्थांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे, १. राज्य निवडणूक आयोग, २. ठाणे उपविभागीय अधिकारी कार्यालय, ३. मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालय, ४. मुंबई शहर जात प्रमाणपत्र पडताळणी समिती. प्रशासकीय तपासणीत अशा काही त्रुटी आढळल्या आहेत, ज्यांनी या दाव्याला पुष्टी दिली आहे, सहर शेख यांनी सादर केलेल्या जात प्रमाणपत्राच्या झेरॉक्सवर चक्क 'महाराष्ट्र शासन' असा उल्लेखच नाही, तसेच त्यावर उपविभागीय अधिकाऱ्यांची स्वाक्षरीदेखील नसल्याचे आढळले आहे. वडील युनूस शेख यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील वडिलांच्या नावात बदल दिसून आला असून, त्यांच्या काकांचे जात प्रमाणपत्र चक्क उत्तर प्रदेशातील गाझियाबादचे असल्याचे उघड झाले आहे. परराज्यातून आलेल्या व्यक्तींसाठी असलेल्या 'स्थलांतरित अधिनियम २०००' मधील कलम ६ अंतर्गत आवश्यक असलेल्या 'नमुना १०' ची पूर्तता करण्यात आलेली नाही.

नियमानुसार, दुसऱ्या राज्यातील रहिवासी असताना त्यांनी महाराष्ट्रात आरक्षणाचे फायदे पदरात पाडून घेण्यासाठी जात प्रमाणपत्राचा गैरवापर केल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाले आहे. त्यांचे वडील युनूस शेख यांचेही जात प्रमाणपत्र अवैध असल्याचे तक्रारीत म्हटले होते, ज्यामध्ये आता तथ्य असल्याचे प्रशासकीय स्तरावर मान्य करण्यात आले आहे. कळवा-मुंब्रा परिसरात जितेंद्र आव्हाडांविरुद्ध राजकीय शड्डू ठोकणाऱ्या शेख कुटुंबासाठी हा मोठा प्रशासकीय धक्का मानला जात आहे.

जात पडताळणीत प्रमाणपत्र अवैध ठरल्याने आता सहर शेख यांचे नगरसेवक पद जाणार की त्या याविरोधात न्यायालयात दाद मागणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणामुळे ठाणे महापालिकेच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

### प्रशासकीय चौकशी मोठे खुलासे समोर

१८ मार्चची सुनावणी युनूस शेख यांनी प्रकृतीचे कारण देत टाळली असली, तरी २३ मार्च रोजी पार पडलेल्या दुसऱ्या सुनावणीत ठाणे तहसीलदारांनी सादर केलेल्या पुराव्यांवरून गंभीर ताशेरे ओढले आहेत. या संपूर्ण प्रकरणात सर्वात संशयास्पद बाब म्हणजे रहिवासाचे ठिकाण आणि दाखला देणारे कार्यालय यातील तफावत. "सहर शेख जर ठाण्याच्या रहिवासी होत्या, तर त्यांनी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाचा आधार का घेतला?" असा थेट सवाल प्रशासनाने उपस्थित केला आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात राहत असताना मुंबईतून कागदपत्रे काढण्यामागे शासकीय यंत्रणेची दिशाभूल करण्याचा किंवा माहिती लपवण्याचा हेतू होता का, याची आता सखोल चौकशी सुरू झाली आहे. तहसीलदारांच्या अहवालात समोर आलेल्या या तांत्रिक त्रुटींमुळे शेख कुटुंबापुढील कायदेशीर अडचणी आता अधिकच वाढण्याची चिन्हे आहेत. प्रशासकीय यंत्रणेला अंधारात ठेवून हे प्रमाणपत्र मिळवण्यात आल्याचा संशय बळावल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

### नेमका घोटाळा कसला?

तक्रारदार सिद्दिकी अहमद यांनी पुराव्यांसह केलेल्या तक्रारीनुसार, या प्रकरणात प्रशासकीय नियमांची मोठी पायमल्ली झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सहर शेख यांचे वडील युनुस शेख हे मुळचे उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील रहिवासी आहेत. नियमानुसार, इतर राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या व्यक्तींना 'नमुना १०' लागू होतो. मात्र, युनुस शेख यांनी जाणीवपूर्वक अधिका यांची दिशाभूल करत 'नमुना ८' चा वापर करून महाराष्ट्राचा इतर मागास प्रवगार्चा दाखला मिळवल्याचा ठपका तक्रारीत ठेवण्यात आला आहे. याच बनावट कागदपत्रांच्या आधारे सहर शेख यांनी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातून जात प्रमाणपत्र मिळवले आणि ठाणे महापालिका निवडणुकीत विजय संपादन केला. तक्रारदार सिद्दिकी अहमद यांनी ठाणे उपविभागीय अधिकारी कार्यालयात या वैधतेवर आक्षेप घेतल्याने, आता प्रशासकीय चौकशीत सहर शेख यांचे पद धोक्यात आले आहे. परराज्यातील रहिवासी असूनही चुकीच्या पद्धतीने आरक्षणाचा लाभ घेतल्याचे सिद्ध झाल्यास त्यांच्यावर मोठी कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे.

### शेख पिता-पुत्रीवर गुन्हा दाखल होणार?

बनावट जात प्रमाणपत्र प्रकरण आता केवळ पद रद्द होण्यापुरते मर्यादित राहिले नसून, नगरसेविका सहर शेख आणि त्यांचे वडील युनूस शेख यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. ठाणे उपविभागीय जिल्हाधिकारी आणि कोकण विभाग जात पडताळणी समितीने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन दोघांवरही कायदेशीर कारवाई करत गुन्हा दाखल करण्याची शिफारस केली आहे. प्रशासकीय तपासणीत असे दिसून आले आहे की, जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आणि ते सादर करताना कागदपत्रांमध्ये जाणीवपूर्वक फेरफार करण्यात आली आहे. चुकीची माहिती देऊन आणि शासकीय यंत्रणेची दिशाभूल करून हे प्रमाणपत्र मिळवल्याचा संशय समितीने व्यक्त केला आहे. केवळ राजकीय कारकीर्दच नव्हे, तर आता फौजदारी गुन्ह्याचाही सामना शेख कुटुंबाला करावा लागू शकतो. प्रशासनाच्या या शिफारसीनंतर आता पोलीस प्रशासन काय पावले उचलते आणि या प्रकरणाला कोणते वळण मिळते, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. चुकीच्या मार्गाने सत्तेची खुर्ची मिळवणाऱ्यांविरुद्ध आता कठोर कारवाईचे संकेत मिळत आहेत.

# या गावाने चक्क सुरु केलंय, महाराष्ट्रात जनावरांच पाहिलं ब्युटी पार्लर

## लोकसहभागातून 'या' ग्रामपंचायतीचा नावीन्यपूर्ण उपक्रम

■सातारा। प्रतिनिधी,

महाराष्ट्रासह देशभरातून तब्बल ८२ पुरस्कार मिळवलेली मान्याचीवाडी ग्रामपंचायत, आता पुन्हा एकदा नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे चर्चेत आली आहे, मान्याचीवाडीने महाराष्ट्रात पहिल्यांदाच जनावरांसाठी 'ब्युटी पार्लर' म्हणजेच अत्याधुनिक स्नानगृह सुरू केले आहे. नदी-ओढ्यांतील प्रदूषण रोखण्यासाठी उचललेले हे पाऊल सध्या सर्वत्र कौतुकास्पद ठरते आहे.

गावाला देशपातळीवर उत्कृष्ट ग्रामपंचायतीचा सन्मानही मिळालेला आहे. सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील ग्रामीण भागात असलेल्या गावातील मान्याचीवाडी ग्रामपंचायत गेल्या अनेक वर्षांपासून विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या या गावाला देशपातळीवर उत्कृष्ट ग्रामपंचायतीचा सन्मानही मिळाला आहे. आता या ग्रामपंचायतीने जनावरांसाठी अत्याधुनिक स्नानगृह उभारून एक नवा आदर्श निर्माण केला आहे.




शासनाच्या माध्यमातून घनकचरा आणि सांडपाण्यावर मोठी यंत्रणा राबवली जाते. मात्र ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्याकडे असलेल्या पाळीव जनावरांच्या माध्यमातून होणाऱ्या प्रदूषणावर अपेक्षित काम होत नाही. यामुळे येथील ग्रामपंचायतीने लोकसहभागातून गावात असलेल्या पाळीव प्राण्यांसाठी स्नानगृहाची उभारणी केली आहे. गावातील पाळीव जनावरांमुळे नदी-ओढ्यांमध्ये होणारे प्रदूषण रोखण्यासाठी हा अभिनव प्रयोग राबवण्यात आला आहे.

हे स्नानगृह अत्यंत सुसज्ज आणि सर्व सोयींनी युक्त आहे. यात शॉवर, स्वच्छ पाणी, घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाण्यावर प्रक्रिया अशा सुविधा उपलब्ध आहेत. 'शासनाकडून नेहमीच सांडपाण्यामुळे होणाऱ्या प्रदूषणावर उपक्रम राबविले जातात. मात्र जनावरांना धुण्यामुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत कोठेच कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. मात्र आमच्या या उपक्रमामुळे या प्रदूषणाला चाप बसेल', असा विश्वास ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

# 'डॉमिनोज पिज्झा'मधून ४.५९ लाखांचा सिलिंडर साठा जप्त

■मुंबई। प्रतिनिधी,

व्यावसायिक वापरासाठीच्या नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीररीत्या गॅस सिलिंडरचा मोठा साठा बाळगणाऱ्या ठाण्यातील ह्यडॉमिनोज पिज्झाह्ण या नामांकित उपाहारगृहावर शिधावाटप भरारी पथकाने गुरुवारी कारवाईचा बडगा उगारला. ठाण्यातील वंडर मॉल परिसरातील या स्टोअरमधून सुमारे ४ लाख ५९ हजार रुपये किमतीचा अवैध सिलिंडर साठा जप्त करण्यात आला असून या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा (चर्चगेट) यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. भरारी पथकाने या स्टोअरच्या तळघरात छापा टाकला असता, तिथे विविध गॅस कंपन्यांच्या सिलिंडरचा साठा आढळला. यामध्ये कोणतीही सुरक्षिततेची मानके न पाळता हा साठा दडवून ठेवण्यात आला होता. या कारवाईत एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसी आणि गो गॅस कंपन्यांचे एकूण १४० सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. यात ५५ गॅसने




भरलेले, तर ८५ रिकाम्या सिलिंडरचा समावेश आहे. जप्त केलेला एकूण ४ लाख ५९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल प्रशासनाने सीलबंद केला आहे.

या बेकायदेशीर साठवणुकीप्रकरणी एका संशयित आरोपीला ताब्यात घेऊन चितळसर पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे. संबंधित आरोपीविरुद्ध 'जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५' मधील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यावसायिक आस्थापनांमध्ये घरगुती किंवा नियमबाह्य पद्धतीने गॅसचा वापर करणे हा गंभीर गुन्हा असून, अशा साठ्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यताही पथकाने वर्तवली आहे.

# दीड वर्षे शरीसंबंध, नंतर 3 वेळा गर्भपात

## लग्नाचे आमिष दाखवून बिल्डरच्या मुलावर बलात्काराचा आरोप

■मुंबई। प्रतिनिधी,

नामांकित बिल्डरच्या मुलाने एका तरुणीला लग्नाचे खोटे आमिष दाखवून तिचे लैंगिक शोषण केले. तो एवढ्यावर न थांबता तिला एक दोन वेळा नाही,तर तब्बल तीन वेळा गर्भपात करण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोप आहे. पीडितेचा असा आरोप की, पोलीस आयुक्तांना विनंती केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित प्रकरण उत्तर प्रदेशातील भोपाळमधील आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून बिल्डरने तरुणीचे केले लैंगिक शोषण

शहरातील नामांकित बिल्डरकडे कामाला लागल्यानंतर एका तरुणीशी मोठी गद्दारी झाली. पीडितेचा असा आरोप की, बिल्डरच्या मुलाने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिला फसवले. त्याने मैत्रीचा हात पुढे केला, पण नंतर शरीरसंबंध ठेवत लैंगिक अत्याचार केले. तिला एमपी नगरातील नामांकित हॉटेलमध्ये नेण्यात आले, जिथे तिची अनेकदा अब्रू लुटली.

पीडितेसाठी न्यायाचा मार्ग सोपा नव्हता, संबंधित प्रकरणात असा आरोप करण्यात आला की, पोलीस आयुक्तांच्या कार्यालयात अर्ज दाखल करूनही बराच काळ झाला तरीही सुनावणी झाली नाही. अखेरीस, एसीपीने केलेल्या तपासानंतर एमपीनगर पोलीस ठाण्यात एफआरआय दाखल केला. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आश्वासन देत आहेत.

पोलिसांनी संबंधित प्रकरणाचा तपास सुरु केला आहे. पण धतिंगगिरी करणाऱ्या लोकांविरुद्ध पोलिसांना कारवाई करण्यास इतका वेळ का लागतो? पीडिता अद्यापही त्याच क्षणाची वाट पाहत आहे. दरम्यान, लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात अतिरिक्त डीसीपी म्हणाले, एमपीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितलं की, पीडित आणि आरोपी दोघेही विवाहित आहेत. पीडितेचा घटस्फोट झाला असून, घटस्फोटानंतर ती भोपाळला आली असता, तक्रारीनंतर पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

### बिल्डरने शरीरसंबंध निर्माण करून लग्नास दिला नकार

संबंधित प्रकरणात पीडितेनं लैंगिक अत्याचाराची तक्रार दाखल केली आहे. पीडिता ही कानपूरची रहिवासी असून कामासाठी भोपाळला आली होती. भोपाळमध्ये एका बिल्डरच्या सानिध्यात काम करत होती. बिल्डरच्या संपर्कात आल्याने तिची मैत्री झाली आणि नंतर त्यांचे शरीरसंबंध निर्माण झाले. बिल्डरने तिच्याशी विवाह करण्याचे वचन दिले होते, परंतु त्याने नकार दिल्याने पीडितेनं तक्रार दाखल केली.



# भाजप नेता असल्याचा दावा... 16 वर्षीय मुलीवर 19 वेळा लैंगिक अत्याचार अन्...

### कृष्णाच्या कुटुंबीयांकडून पीडितेच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी

या एकूण घटनेची माहिती विद्यार्थिनीने तिच्या आईला सांगितली, तेव्हा पीडितेची आई आरोपीच्या घरी गेली. या प्रकरणात असा आरोप आहे की, कृष्णाचे वडील, भाऊ, आणि काका यांनी पीडितेच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिली. पीडितेची आई म्हणाली की, 'आम्ही त्यांना अनेकदा सांगितले पण, त्यांनी आमच्यावर नको तेच आरोप केले.' आईच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी व्यवस्थापक कृष्णा पांडे आणि इतर पाच जणांविरुद्ध फसवणूक, बनाव आणि पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला.

■मुंबई। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील कानपूर येथील नजीराबाद पोलीस ठाणे परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. स्वतःला बीजेपी सोशल मीडियाचा प्रभारी असल्याचा दावा कृष्णा पांडे नावाच्या तरुणाने केला होता. आता त्याच व्यक्तीने एका 16 वर्षीय पीडितेवर तब्बल 19 वेळा लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तरुणीने लग्नाचे वचन देऊनच विद्यार्थिनीला प्रेमप्रकरणात ओढले, तिच्याशी शरीरसंबंध ठेवण्यासाठी त्याने तिला हॉटेलवर नेले.

हॉटेलची खोली मिळवण्यासाठी त्याने आधारकार्डवरील खोटी जन्मतारीख दाखवली.



या प्रकरणात पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली असून प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

### लग्नाचे आमिष दखवून पीडितेवर 19 वेळा लैंगिक अत्याचार

पीडितेच्या माहितीनुसार, कृष्णा पांडे तिला सोशल मीडियावर भेटला होता. त्याने सुरुवातीला लग्नाचे आमिष दखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. आरोपीने पहिल्याच भेटीत विद्यार्थिनीचा अश्लील व्हिडिओ रेकॉर्ड केला. नंतर त्या व्हिडिओचा वापर करून तिला ब्लॅकमेल केले आणि 19 वेळा वेगवेगळ्या हॉटेल्सवर नेऊन तिचा लैंगिक छळ केला. तिने याला विरोध केल्यास तिचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. आरोपीने भाजप नझीराबाद मंडळाचे सोशल मिडियाचे प्रभारी असल्याचा दावा केला. हे प्रकरण चिघळल्यानंतर भाजप शहराध्यक्ष अनिल दीक्षित यांनी सांगितलं की, तरुणाला पक्षातून काढून टाकले होते, तो सध्या भाजपचा सदस्य देखील नाही.

# अल्पवयीन बहिणीवर सामूहिक बलात्कार, चुलत भावासह गावातील चौघांचा समावेश... समोर आलं प्रकरण

■मुंबई। प्रतिनिधी,

एका अल्पवयीन मुलीवर पाच जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या पाच जणांमध्ये पीडित मुलीच्या चुलत भावाचाही समावेश असून, या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. रविवारी रात्री घडलेली ही घटना सोमवारी (13 एप्रिल) सकाळी उघडकीस आली. यानंतर पोलिसांनी तत्परतेने तातडीने पावले उचलत कारवाईला सुरुवात केली आहे. बिहारच्या गया परिसरातील ही घटना आहे.

### चौघांना अटक, एकजण फरार

पीडित मुलीच्या पालकांच्या तक्रारीवरून पोलिसांनी त्वरित गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक अखिलेश कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत सनोज, अनुज, शिशुपाल आणि साजन या चार आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर पाचव्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके छापेमारी करत आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एक जण तीन मुलांचा बाप आहे.

### घटनास्थळावर रक्ताचे डाग

या गंभीर प्रकरणाची दखल घेत शेरघाटीचे डीएसपी आणि फॉरेन्सिक टीमने घटनास्थळी भेट दिली आहे. घटनास्थळावर रक्ताचे डाग आढळले असून फॉरेन्सिक तज्ज्ञांनी त्याचे नमुने घेतले आहेत. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, फरार असलेल्या शेवटच्या आरोपीला लवकरच अटक केली जाईल, अशी ग्वाही प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### शौचाला जाताना अडवले

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी रात्रीच्या वेळी घराबाहेर शौचासाठी गेली असता, पाच जणांनी तिला अडवले. यात चार गावकरी आणि एका समारंभामध्ये डेकोरेशन करणाऱ्या व्यक्तीच्या मुलाचाही समावेश होता. त्यांनी मुलीचे तोंड दाबून तिला ओढत निर्जनस्थळी नेले आणि तिच्यावर पाशवी अत्याचार केले. घटनेनंतर नराधमांनी मुलीला जीवे मारण्याची धमकी दिली होती, मात्र घरी पोहोचताच तिने आपल्या कुटुंबीयांना घडलेला सर्व प्रकार सांगितला.

# दुसरी बायको माहेरी गेली, सावत्र मुलीला पाहून बाप सैतान बनला... घरातच जबदरस्तीने लैंगिक अत्याचार

■बीड। प्रतिनिधी,

बीड जिल्ह्यातील केज शहरात नात्याला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. एका नराधम सावत्र पित्याने आपल्याच 13 वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असून, यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील पीडित मुलीच्या आईने दोन मुली झाल्यानंतर, पहिल्या पतीसोबत पटत नसल्यामुळे ९ वर्षांपूर्वी त्याच्यापासून फारकत घेतली होती. त्यानंतर साधारण ८ वर्षांपूर्वी तिने या नराधम आरोपीशी दुसरे लग्न केले होते. या दुसऱ्या पतीपासून तिला एक मुलगा देखील झाला आहे. ही पीडित मुलगी आपल्या आईसोबत आणि आईने केलेल्या दुसऱ्या पतीसोबत एकाच घरात राहत होती. मात्र, ज्याच्यावर संरक्षणाची जबाबदारी होती, त्याच पित्याने मुलीच्या अगतिकतेचा फायदा घेत हे निंदनीय कृत्य केले आहे.

### आई माहेरी जाताच नराधम सावत्र पित्याचे कृत्य

ही घटना ९ एप्रिल रोजी घडली, जेव्हा पीडित मुलीची आई सकाळी 11:30 वाजता आपल्या माहेरी गावाकडे गेली होती. यावेळी घरात केवळ पीडित मुलगी आणि तिचा लहान भाऊच हजर होते. दुपारी 12:30 च्या सुमारास सावत्र पिता घरी आला आणि त्याने मुलीकडे तिच्या आईबद्दल चौकशी केली. आई कधी परत येणार आहे हे जाणून घेण्यासाठी त्याने मुलीला आईला फोन करायला लावला. आईने फोनवर परत यायला वेळ लागेल असे सांगितल्यानंतर, आरोपीने हे पाऊल उचलले. त्याने आपल्या साडेतीन वर्षांच्या लहान मुलाला विचलित करण्यासाठी त्याच्या हातात मोबाईल देऊन त्याला खाली बसवले. त्यानंतर मुलीला कॉटवर बसवून तिच्यासोबत लज्जास्पद चाळे करण्यास सुरुवात केली. मुलीने याला कडाडून विरोध केला आणि आईला सांगण्याची धमकी दिली, मात्र आरोपीने "आईला सांगायचे नसते, आपल्यात भांडणे होतील" असे धमकावत तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला.



### पोलीस तक्रार आणि कायदेशीर कारवाई

याप्रकरणी 12 एप्रिल रोजी पीडित मुलीच्या आईने केज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिच्या तक्रारीवरून सावत्र पित्याविरुद्ध गु. र. नं. 198/2026 नुसार भारतीय न्याय संहिता कलम 64 (3)(एफ), 65 (1) आणि पोक्सो कायद्याच्या कलम 4 व 5 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणाचा तपास पिंक पथकाचे फौजदार प्रकाश शेळके यांच्याकडून केला जात आहे. समाजात घडणारी अशी कृत्य ही नात्यांमधील ओलावा आणि विश्वास संपवणारी आहेत. आरोपीला लवकरात लवकर कठोर शिक्षा व्हावी, जेणेकरून भविष्यात असे कृत्य करण्याची कोणाची हिंमत होणार नाही, अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे. पोलिसांनी या नराधमाला ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर कारवाई वेगाने सुरू आहे.

### पीडितेने दिलेला धीर आणि पोलिसांत धाव

काही वेळाने पीडितेची आई माहेरून परत आली तेव्हा तिला आपली मुलगी कोपऱ्यात बसून रडताना दिसली. मुलगी प्रचंड घाबरलेली होती आणि ती काहीही बोलण्याच्या मनस्थितीत नव्हती. आईने तिला अनेक वेळा विचारणा केली, मात्र भीतीपोटी ती गप्प राहिली. अखेर आईने तिला विश्वासात घेऊन मायेने विचारणा केल्यानंतर, मुलीने आपल्यासोबत घडलेल्या त्या काळ्या कृत्याची सर्व माहिती आईला सांगितली. पोटच्या मुलीवर झालेल्या या अन्यायामुळे आईला मोठा धक्का बसला आणि तिने तात्काळ पोलिसांत जाण्याचा निर्णय घेतला. नात्यातील विश्वास आणि सुरक्षितता या घटनेमुळे पूर्णपणे मोडीत निघाली असून, एका अल्पवयीन मुलीला स्वतःच्या घरातच ज्या नरकयातना भोगाव्या लागल्या, त्यामुळे समाजमन सुन्न झाले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com